महाराष्ट्र विधानसभा

चौथे अधिवेशन, २०२२

अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

प्रश्नांची एकूण संख्या - ५०

बीड जिल्ह्यातील महावितरण कंपनीच्या दुरुस्ती कामात झालेल्या कोट्यवधी रुपयांच्या गैरव्यवहाराबाबत.

(१) ९४३४ (०२-०६-२०२०). श्री.संदिप क्षिरसागर (बीड) : सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बीड जिल्ह्यातील विशेषतः बीड आणि शिरूर तालुक्यातील उच्च दाब वितरण प्रणाली (HDVS)या योजनेअंतर्गत महावितरण कंपनीकडून प्रणाली दुरुस्ती व इतर कामांचे सुमारे ११० कोटी रुपयांचे कंत्राट वोल्टाज पॉवर प्रा.लि. या कंपनीला देण्यात आले हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कृषी पंपाचे विद्युतीकरण, ३३ के.व्ही. उप केंद्राची दुरुस्ती, प्रणाली दुरुस्ती व इतर कामे उक्त नमूद कंत्राटदार कंपनीच्या कामाची मुदत पूर्ण होऊनही विहित मुदतीत झालेली नाहीत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी लोकप्रतिनिधी यांनी दिनांक १८ मार्च, २०२० रोजी वा त्यासुमारास महावितरण, बीड यांच्याकडे लेखी तक्रार देऊनही दोषीविरुद्ध अद्याप कोणतीच कार्यवाही करण्यात आली नाही हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, शेतकऱ्यांना कृषी पंपाचे विद्युतीकरण करण्यासाठी होणारी पैशांची मागणी, दुरुस्तीच्या कामाकडे होणारा विलंब या बाबी लक्षात घेऊन कंत्राटदारास प्रशासकीय पातळीवर मदत करणाऱ्या महावितरण कंपनीतील अधिकाऱ्यांविरुद्ध शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (११-११-२०२२) : (१) मे.वोल्टास प्रा.लि. यांना उच्चदाब वितरण प्रणाली योजनेअंतर्गत बीड व शिरुर तालुक्यातील (जि.बीड) मार्च, २०१८ पूर्वी पैसे भरुन प्रलंबित असणाऱ्या शेतकऱ्यांना कृषीपंपाचे विद्युतीकरण करण्याचे कंत्राट देण्यात आलेले आहे. सदर कंपनीस देण्यात आलेल्या कार्यादेशाची रक्कम बीड व शिरुर तालुक्यातील कामाकरिता अनुक्रमे रु. १३.१४ कोटी व रु. ७.४८ कोटी इतकी आहे. यात फक्त कृषीपंप विद्युतीकरणाचा समावेश असून प्रणाली दुरुस्ती व इतर कामांचा समावेश नाही.

(२) मे.वोल्टास प्रा.लि.यांचे कंत्राटामध्ये फक्त कृषीपंप विद्युतीकरणाचा समावेश आहे. बीड तालुक्यामध्ये ७७० ग्राहकांची कामे प्रस्तावित असून त्यापैकी १३२ ग्राहकांची कामे पूर्ण झालेली आहे व ८५ ग्राहकांची कामे प्रगतीपथावर आहे. तसेच शिरुर तालुक्यामध्ये ४२३ ग्राहकांची कामे प्रस्तावित असून त्यापैकी १६९ ग्राहकांची कामे पूर्ण झालेली आहे व ४९ ग्राहकांची कामे प्रगतीपथावर आहे. या कंत्राटात ३३ के.व्ही. उपकेंद्र दुरुस्ती, प्रणाली दुरुस्ती व इतर कामांचा समावेश नाही. बीड जिल्ह्यांतर्गत ३३ के.व्ही. उपकेंद्राची दुरुस्ती, प्रणाली दुरुस्ती व इतर कामांसाठी एकूण ८६ कंत्राटदारांची ३ वर्षांकरिता नेमणूक करण्यात आलेली आहे.

(३) हे खरे नाही. मे.वोल्टास प्रा.लि. यांचेकडून कामात झालेल्या विलंबासाठी दोन वेळा नोटीस टू करेक्ट देण्यात आलेली आहे. ३३ के.व्ही. उपकेंद्राची दुरुस्ती, प्रणाली दुरुस्ती इ. कामांकरिता मे.योगेश इलेक्ट्रीकल्स, माजलगांव यांनी त्यांना देण्यात आलेल्या कामांपैकी एकाही कामास सुरुवात न केल्यामुळे त्यांचा कार्यादेश दि.२२.१२.२०२० अन्वये रद्द करण्यात येऊन त्यांची अनामत रक्कम जप्त करण्यात आलेली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यात वीज चोरी रोखण्यासाठी करावयाच्या उपाययोजना

(२) १२०४६ (१९-०७-२०२०). श्री.चेतन तुपे (हडपसर), श्री.सुनिल टिंगरे (वडगाव शेरी), श्री.दिलीप मोहिते-पाटील (खेड आळंदी) : सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात वीज चोरीचे प्रमाण वाढले असून माहे जानेवारी, २०१४ ते जुलै, २०१९ या कालावधीमध्ये ६२,८३० वीज चोरीची प्रकरणे उघडकीस आली असल्याची बाब माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वीज चोरीच्या प्रकरणातील ७२६३ प्रकरणे ही विविध लोकांनी दिलेल्या माहितीच्या अनुषंगाने निदर्शनास आली असून यासाठी महावितरण कंपनी तर्फे माहिती देणाऱ्या लोकांसाठी ६७ लाख २३ हजार ७९५ रुपये बक्षीस स्वरुपात दिले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्यात वीज चोरी व गळतीचे प्रमाण वाढल्याने महावितरण कंपनीला सुमारे ४ हजार कोटींचे आर्थिक नुकसान झाल्याचे माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन वीज चोरी व गळतीला आळा घालण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (११-११-२०२२) : (१) महावितरणकंपनी अंतर्गत माहे जानेवारी, २०१४ ते जुलै, २०१९ या कालावधीत वीजेच्या चोरीविरुध्द राबविलेल्या मोहिमेअंतर्गत एकूण २,७८,९०१ वीज चोरी प्रकरणे उघडकीस आलेली आहेत.

(२) महावितरण अंतर्गत माहे जानेवारी, २०१४ ते जुलै, २०१९ या कालावधीत वीजेच्या चोरीविरध्द राबविलेल्या मोहिमेअंतर्गत खबऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार वीज चोरी करणाऱ्यांविरुध्द भरारी पथकाद्वारे धडक कारवाई करण्यात येऊन, ६७३ वीज चोरी प्रकरणी रु.९५.९१ लक्ष हे माहिती देणाऱ्यांना बक्षिस स्वरुपात देण्यात आलेले आहेत.

(३) वितरण हानी ही तांत्रिक हानी असून सदरची हानी ही एकूण महसूलाच्या गरजेमध्ये (Aggregate Revenue Requirement) यामध्ये समाविष्ट करण्यात येते. त्यामुळे महावितरणची महसूल हानी होते असे म्हणता येणार नाही.

(४) वीज चोरी व तांत्रिक हानी रोखण्यासाठी खालील उपाययोजना महावितरण कंपनीमार्फत करण्यात येतात :-

१. राज्यात महावितरण कंपनीची एकूण कायम स्वरुपी ४३ फिरती पथके आपआपल्या कार्यक्षेत्रात नियमितपणे विद्युत संचातील अनियमितता व वीजचोरीचे प्रकार शोधून काढण्यासाठी कार्यरत आहेत.

२. याशिवाय राज्यात विभागीय पातळीवर विशेष पथके स्थापन करण्यात आलेली आहेत.

३. वीजचोरीची प्रकरणे उघडकीस आणण्याकरीता फिरत्या पथकांमार्फत खास तपासणी मोहिमा राबविण्यात येतात.

४. वितरण प्रणाली सुधारणेसाठी नवीन उपकेंद्रे उभारणी, उपकेंद्राची क्षमतावाढ करणे, नवीन उच्चदाब वाहिन्या/लघुदाब वाहीन्या, तसेच नवीन रोहित्र उभारणी करणे हि कामे नियमित होतात, वितरण प्रणाली सुधारणेमुळे तांत्रिक हानी कमी होण्यास मदत होते.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

मिरा-भाईंदर महानगरपालिकेचे कार्यकारी अभियंता यांचेवर अज्ञात गुंडांकडून गोळीबार झाल्याबाबत

(३) ३२७९२ (०७-०१-२०२२). श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), श्री.लहू कानडे (श्रीरामपूर) : सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मिरा-भाईंदर महानगरपालिकेचे कार्यकारी अभियंता यांचेवर दिनांक २९ सप्टेंबर, २०२१ रोजी वा त्यासुमारास अज्ञात व्यक्तीकडून गोळीबार करण्यात आल्याचे प्रकरण मिरा-भाईंदर-वसई-विरार पोलीस आयुक्तालयाच्या गुन्हा शाखेकडे नोंदविले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या गोळीबार प्रकरणाची चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुसार आतापर्यंत पोलीसांनी किती गुन्हेगारांना अटक केली आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (१८-११-२०२२) : (१) मिरा-भाईंदर महानगरपालिकेचे कार्यकारी अभियंता यांच्यावर दिनांक २९ सप्टेंबर २०१९ रोजी शासकीय वाहनाने मीरा-भाईंदर महानगरपालिका कार्यालयातून घरी परत येत असताना त्यांच्यावर दोन अनोळखी इसमांनी अग्निशस्त्रातून गोळीबार करून जीवे ठार मारण्याचा प्रयत्न करून जखमी केले. यासंदर्भात कस्तुरबा मार्ग पोलीस ठाणे, मुंबई येथे गुन्हा रजिस्टर क्रमांक १०५०/२०२१ कलम ३०७, ३२४, ३४ भादवि सह ३,२५,२७ भाहका सह कलम ३७ (१) (अ), १३५ मपोका अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

सदर घटना बृहन्मुंबई पोलीस आयुक्तालयाच्या कार्यक्षेत्रामध्ये घडली असल्याने मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयाच्या गुन्हा शाखेकडे नोंदविण्यात आलेला नाही.
(२) या गुन्ह्यात सहा आरोपींना अटक करण्यात आली असून आरोपीं विरुद्ध मा.न्यायालयात दोषारोप पत्र दाखल करण्यात आले आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यातील हजारो गुतवंणूकदारांची कोट्यावधी रुपयांची रक्कम
पॅनकार्ड क्लब लिमिटेड कंपनीत अडकून पडल्याबाबत

(४) ३३१३६ (१४-०१-२०२२). श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी) : सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील हजारो गुतवंणूकदारांची कोट्यवधी रुपयांची रक्कम पॅनकार्ड क्लब लिमिटेड कंपनीत अडकून पडल्याने गृहमंत्री, महाराष्ट्र राज्य व वित्त व नियोजन यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक १६ सप्टेंबर, २०२१ रोजी वा त्यासुमारास मंत्रालय, मुंबई येथे बैठकीचे आयोजन करण्यात आले होते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त कोट्यवधी रुपयांची रक्कम शासनाकडे असून मालमत्ता व जमिनी लिलाव विक्री करण्याची कार्यवाही उपजिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, मुंबई शहर यांनी सक्षम प्राधिकारी म्हणून करण्याचे निर्देश बैठकीत दिले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत बैठकीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (१८-११-२०२२) : (१) व (२) सदर प्रकरणी मा. राज्यमंत्री (गृह/ग्रामीण) यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक १६/०९/२०२१ व दिनांक २५/११/२०२१ रोजी बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. या बैठकीमध्ये मा. राज्यमंत्री (गृह/ग्रामीण) यांनी प्रकरणाचा आढावा घेऊन पुढील कार्यवाही तातडीने करण्याच्या सूचना दिल्या आहेत.
(३) या प्रकरणी अधिसुचित झालेल्या ७४ मालमत्तांपैकी ज्या मालमत्तांवर मा.विशेष सत्र न्यायालय, न्यायालय क्र.७, मुंबई येथे अदयापपर्यंत हरकत अर्ज दाखल झालेले नाहीत, अशा मालमत्ता निशंक करुन लिलाव करण्यास परवानगी मिळणेबाबतचा अर्ज मा. न्यायालयात दि.२४/०९/२०२१ रोजी सादर करण्यात आला आहे. प्रकरणी ६ पक्षकारांनी कलम ४ (३) नुसार संकीर्ण अर्ज दाखल करुन आक्षेप नोंदविले होते. त्यापैकी ४ संकीर्ण अर्जाबाबत सुनावणी होऊन निकाली काढण्यात आले आहेत.

या प्रकरणी लवकरात लवकर सुनावणी होऊन मालमत्ता विक्रीस परवानगी देणेबाबत मा. न्यायालयास विनंती करण्याबाबत नमूद गुन्ह्यातील विशेष सरकारी वकीलांना सक्षम प्राधिकारी यांच्या मार्फत कळविण्यात आले आहे. मा.न्यायालयाने दिलेल्या आदेशाप्रमाणे हरकत अर्ज दाखल नसलेल्या मालमत्तांची यादी मा.न्यायालयात सादर करण्यात आली आहे. प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे. तसेच १७ अतिरिक्त मालमत्ता अधिसुचित करण्याबाबतचा प्रस्ताव सक्षम प्राधिकारी यांचेकडून शासनास प्राप्त झाला असून त्याची पडताळणी करुन अधिसूचना निर्गमित करण्याची कार्यवाही प्रस्तावित आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

शहापूर (जि. ठाणे) येथील तहसिल कार्यालयाची जागा कमी पडत असल्याबाबत

(५) ३३७६३ (०५-०१-२०२२). श्री.दौलत दरोडा (शहापूर) : सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शहापूर (जि. ठाणे) येथील तहसिल कार्यालयाची जागा कमी पडत असल्याने गोठेघर येथील भातसा कॉलनीच्या जागेसह येथील असलेल्या इमारतींच्या जुन्या वास्तू तहसिल कार्यालयाला मोफत देण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींसह जिल्हा प्रशासनाने माहे ऑक्टोबर, २०२१ रोजी वा त्यादरम्यान मा.जलसंपदा मंत्री, महाराष्ट्र राज्य यांच्याकडे लेखी निवेदनाद्वारे केली आहे हे ही खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर मागणीच्या अनुषंगाने उक्त ठिकाणी असलेल्या इमारतींच्या जुन्या वास्तू तहसिल कार्यालयाला मोफत देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (११-११-२०२२) : (१) होय.

(२) भातसा गोठेघर वसाहतीच्या एकूण ३.१४ हेक्टर मधील विनावापर पडून असलेली १.२३ हेक्टर जागा महसूल विभागास प्रशासकीय इमारत व शासकीय आदिवासी वसतीगृह यांसाठी हस्तांतरणासाठी दि.१२.०२.२०१९ रोजी झालेल्या ७३ व्या नियामक मंडळाच्या बैठकीतील ठराव क्र. ७३/१३ नुसार दुय्यम निबंधक, शहापूर यांचेकडील शिघ्र सिध्द गणकाच्या (रेडीरेकनर) प्रचलित दरानुसार येणारी जमिनीची किंमत रू.१५९.६० लक्ष इतकी रक्कम महामंडळाकडे भरणा करून घेण्याच्या अटीवर मान्यता देण्यात आली आहे.

याबाबत महसूल व वन विभागाने सदरची जागा विनामुल्य हस्तांतरीत करण्याची विनंती जलसंपदा विभागाकडे केली होती. कोकण पाटबंधारे विकास महामंडळ अस्तित्वात आणण्यासाठीच्या अधिनियमामधील तरतुदीनुसार सदरची जागा ही महामंडळाच्या मालकीची आहे. ती जर महसूल विभागास हस्तांतर करायची असेल, तर त्याचा मोबदला घेऊनच हस्तांतर करण्यात येईल, असे महसूल विभागास कळविण्यात आले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

मराठीतील गाजलेल्या ५०० पुस्तकांच्या बेकायदेशीरपणे पीडीएफ तयार केल्याने मराठी ग्रंथ व्यवसायाचे कोट्यावधी रुपयांचे नुकसान झाल्याबाबत

(६) ३४८३८ (१०-०१-२०२२). श्रीमती माधुरी मिसाळ (पर्वती), श्री.सिध्दार्थ शिरोळे (शिवाजीनगर) : सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मराठीतील गाजलेल्या ५०० पुस्तकांच्या बेकायदेशीर पीडीएफ तयार करुन मराठी ग्रंथ व्यवसायाचे कोट्यावधी रुपयांचे नुकसान करणा-यांविरुध्द कांदबरीकार यांनी जुहू पोलीस स्टेशनमध्ये एफआयआर नोंदविला असल्याचे दिनांक १३ सप्टेंबर, २०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यानुसार पोलीसांनी तपास सुरु केला आहे काय, तपासात काय निष्पन्न झाले आहे,

(३) असल्यास, उक्त प्रकरणावर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (१८-११-२०२२) : (१) होय,

(२) व (३) सदर प्रकरणी जुहू पोलीस स्टेशन, मुंबई येथे विशेष स्थानिक गु. र. क्र. ४७/२०२१, कॉपी राईट ॲक्ट मधील कलम ५१ व ६३ आणि माहिती तंत्रज्ञान कायदा मधील कलम ६६ (ड) अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला आहे. सदर गुन्हा तपासाधीन आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

आर्वी,(जि. वर्धा) येथील मौजा मांडला येथील लाभधारक शेतकरी श्री. गोविंद रामचंद्र इंगळे व श्री. किसनराव बोळाखे यांना नुकसान भरपाई मिळण्याबाबत

(७) ३५९८० (०५-०१-२०२२). श्री.दादाराव केचे (आर्वी) : सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजा मांडला (ता.आर्वी, जि. वर्धा) येथील शेतकरी श्री. गोविंद रामचंद्र इंगळे व श्री. किसनराव बोळाखे यांचे शेत अप्पर वर्धा प्रकल्पाचे डाव्या कालव्याचे पाणी पाझरल्याने वहिवाट योग्य राहीली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू शेतकरी सन २०००-२००१ पासून नुकसान भरपाई वा त्या शेती ऐवजी दुसरी शेती मिळण्याबाबत अनेक वर्षापासून मागणी करीत आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, विभागाने दिलेली माहिती चुकीची असून शेतकऱ्यांचे नुकसान हे नैसर्गिक जल निस्सारण व्यवस्थेमुळे नसून कालव्यातुन होणाऱ्या पाझरामुळे असून त्याची व्यवस्था करणे ही शेतकऱ्यांची जबाबदारी नसून शासनाची आहे, हे ही खरे आहे काय,

(४ असल्यास, या शेतकऱ्यांना नुकसान भरपाई किंवा त्या ऐवजी दुसरी शेती देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. देवेंद्र फडणवीस (११-११-२०२२) : (१) हे खरे नाही.

दोन्ही शेतकऱ्यांच्या जमीनी हया नैसर्गिक नाल्यालगत असल्यामुळे व सखल भागात असल्यामुळे कालव्यातुन होणाऱ्या पाझरापेक्षा नैसर्गिक जलनित्सारण व्यवस्था योग्य नसल्यामुळे बाधित होत आहे. त्यामुळे नैसर्गिक नाल्यातील पाण्याचा व नाल्याची साफसफाई (झाडे झुडपे व गाळ काढणे) करणे आवश्यक आहे. तसेच पुर्वी खोदलेल्या पाझर नियंत्रण उपाय योजनांची पाटबंधारे संशोधन विभागाच्या अहवालानुसार निगा राखणे आवश्यक आहे. सदर निगा संबंधीत शेतक-यांनी राखणे आवश्यक आहे.

(२) हे खरे आहे.

(३) हे खरे नाही.

कालव्यातुन होणाऱ्या पाझरापेक्षा नैसर्गिक जलनिस:रण योग्य नसल्यामुळे, सदर शेतकऱ्यांचे शेत बाधित होत आहे. तसेच पुर्वी खोदलेल्या पाझर नियंत्रण उपाययोजनांची पाटबंधारे संशोधन विभागाचे अहवालानुसार निगा राखणे आवश्यक आहे. सदर निगा संबधीत शेतक-यांनी राखणे आवश्यक आहे.

(४) आवश्यक उपाययोजना करुन दिल्या असल्यामुळे प्रश्न उद्भवत नाही

(५) प्रश्न उद्भवत नाही

मौजा देऊरवाडा,(ता. आर्वी, जि. वर्धा) व मौजा सिरसोली, (ता. आष्टी, जि. वर्धा) नदीला गावाच्या भागाकडून संरक्षण भिंत तसेच नगर पंचायत आष्टी अंतर्गत मौजा गौरखेडा, ता. आष्टी, जि. वर्धा येथील नदीला संरक्षण भिंतीची मंजूरी मिळण्याबाबत

(८) ३५९८६ (०६-०१-२०२२). श्री.दादाराव केचे (आर्वी) : सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजा देऊरवाडा (ता. आर्वी, जि. वर्धा) व मौजा सिरसोली, गौरखेडा (ता. आष्टी, जि. वर्धा) येथे नदीला गावाच्या भागाकडून संरक्षण भिंत बांधण्याबाबत पत्राद्वारे मागणी करण्यात आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उर्ध्व वर्धा सिंचन मंडळ अमरावती या विभागाने त्रुटी पूर्ण करून पाठविलेल्या प्रस्तावास मंजुरी देऊन तातडीने निधी उपलब्ध करून देण्यात येणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, आर्वी विधानसभा मतदार संघातील मौजा देऊरवाडा, ता. आर्वी, मौजा सिरसोली, ता.आष्टी तसेच नगर पंचायत आष्टी अंतर्गत मौजा गौरखेडा, ता. आष्टी, जि. वर्धा येथील संरक्षण भिंत होण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

वि.स. १२१ (6)

श्री. देवेंद्र फडणवीस (१५-११-२०२२) : (१) होय.
(२) होय.
मौजे देऊरवाडा येथील पूर संरक्षक भिंतीच्या अंदाजपत्रकातील शासन स्तरावरुन कळविण्यात आलेल्या त्रुंटीची पुर्तता करुन शासनास फेरसादर झाल्यानंतर त्यास प्रशासकीय मान्यता व निधी उपलब्ध करुन देणेबाबत पुढील कार्यवाही करणे नियोजित आहे.
(३) मौजे देऊरवाडा येथील पूरसंरक्षक भिंत बांधण्याचे काम प्रस्तावित आहे. याबाबतचे अंदाजपत्रक शासनास सादर करण्यात आले होते. त्यांस पूरसंरक्षण योजनेच्या कामांना प्रशासकीय मान्यता देण्याबाबत सुधारित धोरणाच्या शासन निर्णय, दिनांक ३१.०८.२०१९ नुसार पूर संरक्षण भिंतीचे सर्वेक्षणाचे काम तसेच लाल व निळी रेषा आखणीचे काम पूर्ण होणे आवश्यक असल्यामुळे सदर काम सद्य:स्थितीत प्रगती पथावर आहे. सदर कामे पूर्ण झाल्यानंतर क्षेत्रिय कार्यालयाकडून पूरसंरक्षण भिंतीच्या कामाचे अंदाजपत्रक शासनास फेर सादर करण्यात येईल.
मौजे सिरसोली व मौजे गौरखेडा येथील नदीला पूरसंरक्षण भिंतीचे सर्वेक्षणाचे काम क्षेत्रिय कार्यालयामार्फत सुरु आहे.
तिन्ही कामांचे त्रुटीविरहीत अंदाजपत्रक व प्रस्ताव शासनास प्राप्त झाल्यानंतर त्यास रितसर पध्दतीने प्रशासकीय मान्यता व निधी उपलब्ध करुन देणेबाबत पुढील कार्यवाही करणे नियोजित आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

महाराष्ट्रात येणाऱ्या महापुराची कारणे शोधून त्याची आवश्यक उपाय योजना न करता निषेधक पूररेषा व नियंत्रक पूररेषा आखण्याबाबत

(९) ३६१३४ (०६-०१-२०२२). श्री.शेखर निकम (चिपळूण), श्री.यशवंत माने (मोहोळ), श्री.राजेश नरसिंगराव पाटील (चंदगड), श्री.सुनिल शेळके (मावळ) : सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शासन परिपत्रक क्र. एफडीडब्लू १०८९/२४३/८९/सिं.व्य. (कामे) दिनांक २१/९/१९८९ व शासन परिपत्रक क्र. पू र नि -२०१८ (१८२/२०१८) (महसूल) दिनांक ३ मे २०१८ रोजी वा त्या सुमारासच्या मार्गदर्शक सूचना संदर्भित परिपत्रक नुसार शहरामध्ये महाराष्ट्र शासन जलसंपदा विभागाकडून महाराष्ट्र राज्यात नदी किनारी निषेधक पूर रेषा व नियंत्रक पूर रेषा या प्रत्यक्ष जागेवर सर्वेक्षण न करता व मागील अनेक वर्षापासून विविध कारणांनी नदी हि गाळाने भरलेली असताना तिची जलवाहन क्षमता वाढविणेचे दृष्टीने कोणतीही उपाययोजना न करता आखण्यात आल्या आहेत हे खरे आहे काय.
(२) असल्यास, शहर व गावातील नैसर्गिक नाले पऱ्हे इ. गेली अनेक वर्षे गाळाने भरलेले आहेत. गाव नकाशा व गटबुक नकाशा तसेच टोपो शीट प्रमाणे असणारी त्याची रुंदी व उंची सुद्धा फार कमी झालेली आहे. अनेक ठिकाणी त्यावर अतिक्रमणे झालेली असून याकडे दुर्लक्ष झालेने पाणी वाहून जाण्यास मोठी अडचण निर्माण होत आहे हे ही खरे आहे काय.
(३) असल्यास, कोकणातील नद्यांच्या समुद्र मुखाजवळ वाळूची मोठी बेट SAND BAR तयार झालेले आहेत त्यामुळे नदीतील पुराचे वाढलेले पाणी ओहोटीच्या काळात समुद्रात आवश्यक गतीने जाण्यास अडचण होत आहे हे हि खरे आहे काय,
(४) असल्यास, नद्यांतील गाळ न काढल्याने नदी मध्ये अनैसर्गिक बेटे तयार झालेली आहेत तसेच मूलतः असणारी बेटे दुप्पट ते तिप्पट क्षेत्रफळांनी वाढलेली आहेत व त्यामुळे सुद्धा पावसाचे पाणी वाहून जाण्यास अडचणी निर्माण होऊन महापूर येत आहे हे हि खरे आहे काय.
(५) असल्यास, विशेषतः चिपळूण तालुक्यात कोयना धरणा पासून पोफळी सरप्लस पॉईंट (TRT), पोफळी वळण बंधारा ते पोफळी सरप्लस पॉईंट (TRT) , पोफळी सरप्लस पॉईंट (TRT) ते कोळकेवाडी धरण, कोयना धरण ते स्तर ४ मार्गे कोळकेवाडी धरण व कोळकेवाडी धरण ते स्तर ४ मार्गे पेढांबे असे बोगदे खणण्यात आले आहेत व या बोगद्यातून निघालेले लक्षावधी घनमीटर दगड गोटे मकिंग हे वैतरणा व वाशिष्ठी नदी व उपनद्यांच्या किनारी टाकून ठेवण्यात आलेले आहेत व हे अति पर्जन्य वृष्टी झाल्यावर या नदी पात्रात वाहून येत आहेत व त्यामुळे हि नदी गाळाने भरत चाललेली आहे हे खरे आहे काय

(६) असल्यास, याप्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (१५-११-२०२२) : (१) हे खरे नाही.
शासन परिपत्रक दिनांक २१.०९.१९८९ व शासन परिपत्रक दिनांक ०३.०५.२०१८ अन्वये दिलेल्या निर्देशानुसार तसेच महासंचालक, मेरी नाशिक यांनी दिनांक १६.११.२०१५ रोजी निर्गमित केलेल्या तांत्रिक परिपत्रकानुसार सर्वेक्षण करुन व जलशास्त्रीय अभ्यासाच्या आधारे जलसंपदा विभागाकडून नदी किनारी निषेधक पूर रेषा व नियंत्रक पूर रेषा आखण्यात आलेल्या आहेत.
(२) होय, हे अंशत: खरे आहे. दर वर्षी नदी, नाले व ओढे यांना पूर येवून नदीपात्रात गाळ साठतो.
शासन परिपत्रक, दिनांक ०३.०५.२०१८ नुसार शहर व गावातील नैसर्गिक नाले व पऱ्हे इ. ठिकाणच्या अतिक्रमणाबाबत कार्यवाही करण्याचे अधिकारी संबंधित स्थानिक स्वराज्य संस्था/महसूल विभाग/महानगरपालीका/ नगरपालीका /नगरपरिषद यांना देण्यात आलेले आहेत.
(३) कोकणातील रायगड जिलहयातील महाड तालुक्यातील सावित्री व गांधारी नदीमध्ये बेटे निर्माण झाली आहेत.
(४) काही भागांमध्ये अशी वस्तुस्थिती आहे.
(५) अंशत: खरे आहे.
बोगद्यातून निघालेले दगड गोटे मकिंग हे नदीच्या तीरापासून सुरक्षित अंतरावर मागील ५० वर्षापासून ठेवले असून वातावरणीय दबावामुळे (Autmospheric pressure) त्याचे एकजीवीकरण (consolidation) होऊन ते बहूतांशी कठीण झाले आहेत. सबब, वशिष्ठी नदी ही दगड गोटे गाळाने भरत चालली आहे हे, खरे नाही.
(६) नदीपात्रातील गाळ व इतर अडथळे काढून नदीपात्राची वहनक्षमता वाढविण्याच्या दृष्टीकोनातून Pilot Project म्हणून कोकणातील वशिष्ठी व सावित्री नदीतील गाळ काढण्याचे काम क्षेत्रिय स्तरावर प्रगतीपथावर आहे.
(७) प्रश्न उद्भवत नाही.

उल्हासनगर येथील पोलीस वसाहतीच्या रिक्त असलेल्या भूखंडावर बेकायदेशीररित्या अतिक्रमण केल्याबाबत

(१०) ३७७७४ (१२-०४-२०२२). श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), श्री.लहू कानडे (श्रीरामपूर), श्रीमती यामिनी यशवंत जाधव (भायखळा) : सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) उल्हासनगर येथील पोलीस वसाहतीचा कॅम्प नं.५ मध्ये रिक्त असलेला भूखंड बेकायदेशीररित्या अतिक्रमण करुन भूखंड लाटण्याचा प्रकार हिललाईन पोलीसांनी निदर्शनास आणला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त भूखंड लाटणाऱ्यांना पोलीसांनी अटक केली आहे काय,
(३) असल्यास, सदर भूखंड पोलीसांसाठी राखून ठेवण्याबाबतचा फलक भूखंडावर लावण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (१७-११-२०२२) :(१) हे खरे आहे.
(२) हिललाईन पोलीस ठाणे उल्हासनगर, (ठाणे पोलीस आयुक्तालय), यांचे कार्यक्षेत्रातील बॅरेक नं १८०१, शीट नं ७४ सिटी सर्व्हे नं.२७६३७, २७६३८, २७६३९ व २७६४० या पोलीस शासकीय निवासस्थान असलेल्या जागेत दोन इसम अतिक्रमण करण्याच्या उद्देशाने मोजणी करत असल्याची माहिती मिळाल्यानंतर त्यानंतर लगेच सदर ठिकाणी जावून बेकायदेशीररित्या मोजणी करणारे आरोपी सतपालसिंग जयमलसिंग चावला व भवज्योत सतपालसिंग चावला यांच्या विरुद्ध हिललाईन पोलीस ठाणे येथे गुन्हा रजि. नं.०७/२०२२ भा.दं.वि. कलम ४४७, ४४८, ३४ प्रमाणे दिनांक ०७.०१.२०२२ रोजी दाखल करण्यात आला असून त्यांना अटक करण्यात आली आहे.

(३) सदर गुन्ह्यांचा तपास चालू असून पोलीस शासकीय निवासस्थान असलेला भूखंड पोलीसांच्या ताब्यात आहे. सदर भूखंड पोलीसांसाठी राखून ठेवण्यात आलेल्या जागेवर फलक लावण्यात आलेला आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

पालघर तहसील कार्यालयातील पुरवठा विभागातील तीन कंत्राटी कर्मचाऱ्यांना पोलीसांनी बनावट रेशनकार्ड प्रकरणी ताब्यात घेतल्याबाबत

(११) ३९१६५ (०७-०४-२०२२). श्री.श्रीनिवास वनगा (पालघर) : सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पालघर तहसील कार्यालयातील पुरवठा विभागातील तीन कंत्राटी कर्मचाऱ्यांना पोलीसांनी बनावट रेशनकार्ड प्रकरणी ताब्यात घेतले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू बनावट रेशनकार्ड प्रकरणाची चौकशी पूर्ण झाली आहे काय व सदर चौकशीत कोणते अधिकारी व कर्मचारी जबाबदार असल्याचे निष्पन्न झाले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, चौकशीअंती दोषी आढळून आलेल्यांवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (१८-११-२०२२) :(१) होय. पालघर तहसिल कार्यालयातील कर्मचाऱ्यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार पालघर पोलीस ठाणे येथे गु.र.क्र. ०८/२०२२ भा.दं.वि.सं. कलम ४२०, ४६५, ४६८, व ४७१ नुसार गुन्हा दाखल करण्यात आला असून ३ आरोपींना दिनांक ०८.०१.२०२२ रोजी अटक करण्यात आली आहे.
(२) सदर प्रकरणी आरोपींनी रेशनकार्डावर बनावट हस्ताक्षर व पुरवठा अधिकाऱ्यांची बनावट स्वाक्षरी करून सदरचे रेशनकार्ड हे मुळ रेशन कार्ड असल्याचे भासवून हस्तांतर केले होते.
(३) सदर गुन्ह्याच्या तपासाअंती ३ आरोपींना अटक करण्यात आले असून सदर गुन्हा पोलीस तपासावर आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

चिपळूण (जि. रत्नागिरी) येथील बाजारपेठ व शहरामध्ये आखण्यात आलेली पूररेषा रद्द करून पूरमुक्तीसाठी प्रयत्न करण्याच्या मागणीबाबत

(१२) ३९४२१ (०१-०४-२०२२). श्री.भास्कर जाधव (गुहागर) : सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) चिपळूण (जि. रत्नागिरी) येथे दिनांक २१ ते २५ जुलै २०२१ रोजी वा त्यासुमारास झालेल्या अतिवृष्टी आणि महापुरामुळे येथील बाजारपेठ व शहराचा बहुतांश भाग पाण्याखाली जात आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, महापुरानंतर बाजारपेठ व शहरामध्ये ठिकठिकाणी लाल व निळया रंगाच्या रेषा (ओळी) आखून पूररेषा निश्चित करण्यात आल्या होत्या, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर पूररेषा आखणी निश्चित झाल्यानंतर स्थानिक व्यापारी, नागरिक, लोकप्रतिनिधी यांचा या पुररेषेला विरोध असून ती रद्द करण्यात यावी आणि पूरमुक्तीसाठी प्रयत्न करावेत, अशी मागणी करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदरहू प्रकरणी चिपळूण शहरामध्ये आलेल्या पूराची कारणमिमांसा व पूरमुक्तीसाठी केंद्रीय जल व विद्युत संशोधन केंद्र पुणे (CWPRS PUNE) या पथकाकडून दि.२२/१०/२०२१ रोजी वा त्यासुमारास क्षेत्रीय पहाणी करण्यात आली तसेच सदर कार्यवाही प्रगतीपथावर असल्याचे निदर्शनास आले असून कार्यवाहीची सद्यःस्थिती काय आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (१५-११-२०२२) : (१) होय, हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.
महापुरापूर्वीच शहरामध्ये लाल व निळया रेषा माहे मे २०२० मध्येच संकेतस्थळावर प्रसिध्द करणेत आल्या असून प्रत्यक्षात क्षेत्रिय स्तरावर आखणी मे २०२१ मध्ये करणेत आली.
(३) होय हे खरे आहे.
नगरपरिषद, चिपळूण यांचे दि.०१.११.२०२१ च्या पत्रान्वये कार्यकारी अभियंता, रत्नागिरी पाटबंधारे विभाग, रत्नागिरी या कार्यालयास पूररेषाबाबत हरकत प्राप्त झाल्या आहेत.
(४) होय हे खरे आहे.
केंद्रीय पाणी व वीज संशोधन केंद्र, पुणे यांचे पथकाकडून दि.२२.१०.२०२१ रोजी क्षेत्रीय पाहणी करण्यात आली असून Model Study अभ्यास तयार करणेचे काम (CWPRS) प्रगतिपथावर आहे.
केंद्रीय पाणी व विज संशोधन केंद्र, पुणे यांचा अंतिम अहवाल प्राप्त होताच त्यास सक्षम स्तरावर मान्यता घेवुन आवश्यक उपाययोजनांची कामे हाती घेणेबाबत कार्यवाही करण्याचे नियोजीत आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

मौजे शिवथर (ता.जि.सातारा) येथील कोरेगांव गावच्या पोटपाटावरुन व पूलावरुन अवैध अवजड वाहतूक बेकायदेशीररित्या होत असल्याबाबत

(१३) ३९८६४ (०१-०४-२०२२). श्री.महेश शिंदे (कोरेगाव) : सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजे शिवथर (ता.जि.सातारा) येथील कोरेगांव गावच्या हद्दीतून धोम पाटबंधारे विभागाच्या डावा कालव्याचा डी वाय ३ च्या पोटपाटावरुन व पूलावरुन गत ३० वर्षापासून अवैध व बेकायदेशीररित्या अवजड वाहतूक होत असल्या प्रकरणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा. मुख्यमंत्री , महाराष्ट्र राज्य यांना माहे जानेवारी, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान लेखी निवेदनाद्वारे चौकशी करण्याची मागणी आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या प्रकरणाची चौकशी केली आहे काय, चौकशीमध्ये काय आढळून आले, तद्अनुषंगाने पोटपाटावरुन व पूलावरुन अवैध अवजड वाहतूकीवर आळा घालण्यासाठी शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (११-११-२०२२) : (१) होय, अंशत: खरे आहे.
तथापि, सदर प्रकरणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांना माहे जानेवारी-२०२२ मध्ये वा त्या दरम्यान लेखी निवेदनाव्दारे चौकशी करण्याची मागणी प्राप्त झालेली नाही
श्री.महेश सुधीर कांबळे, ग्रामपंचायत सदस्य, शिवथर ग्रामपंचायत यांनी धोम डाव्या कालव्याच्या वितरीका क्र.३ च्या पाटावरून श्री.किरण किसनराव साबळे-पाटील यांचेमार्फत होणा-या गौण खनिज वाहतूक संदर्भात कार्यकारी अभियंता, सातारा सिंचन विभाग, सातारा व उपविभागीय अधिकारी, धोम पाटबंधारे उपविभाग क्र.२, सातारा यांचेकडे अनुक्रमे दि.१६.०७.२०२१ व दि.१३.१०.२०२१ रोजी तक्रारीची निवेदने दिली होती.
(२) होय,
सदर तक्रारीच्या अनुषंगाने कार्यकारी अभियंता, सातारा सिंचन विभाग, सातारा कार्यालयाने खालीलप्रमाणे कार्यवाही केली आहे.
श्री.किरण किसनराव साबळे-पाटील, मु.पो.शिवथर यांचेशी शासन निर्णय क्र.संकिर्ण-१०९१/(२७३/९९)/सिंव्य(धोरण), दि.०४.०६.२००३ नुसार दि.२५.०८.२०२१ रोजी अनुज्ञेय शुल्क भरून घेऊन रू.५००/- च्या मुद्रांक शुल्कावर करारनामा करण्यात आला आहे. तसेच सेवापथास हानी पोहचल्यास त्याची दुरूस्ती करणेबाबतचे हमीपत्र त्यांचेकडून विभागीय स्तरावर घेण्यात आले आहे.

सद्य:स्थितीत क्षेत्रीय परिस्थिती व सध्या उपलब्ध असणारा अपुरा क्षेत्रीय कर्मचारी वर्ग इत्यादींचा विचार करून, शासन निर्णय दि.०४.०६.२००३ मधील अटींपैकी अट क्र.४, ८, १२ व १३ या अटी रद्द होणेबाबतचा शासनास प्राप्त प्रस्तावाच्या अनुषंगाने महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे यांचेकरिता खास बाब म्हणून शासन पत्र क्र.संकिर्ण-२०२२/प्र.क्र.३३/सिंव्य(धोरण), दि.१४.०३.२०२२ अन्वये सदर अटी शिथिल करण्यात आल्या आहेत. त्यानुसार सद्य:स्थितीत सदर वाहतूक परवानगी क्षेत्रिय स्तरावर देण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्धवत नाही.

चांदिवली येथील साकिनाका पोलीस वसाहत व पोलीस ठाण्याची इमारत नादुरुस्त असल्याबाबत

(१४) ३९९३० (०७-०४-२०२२). श्री.दिलीप लांडे (चांदिवली) : सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चांदिवली येथील साकिनाका पोलीस वसाहत व पोलीस ठाण्याची इमारत नादुरुस्त व धोकादायक अवस्थेत असल्याने तेथे पोलीस ठाणे नवीन जागेवर बांधण्याबाबत तसेच पोलीस वसाहतीचे नुतनीकरण करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधिंनी सातत्याने विविध आयुधांद्वारे व पत्रव्यवहार करुनही आजतागायत कोणतीच कार्यवाही झालेली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यासंदर्भात पोलिस ठाणे इमारतीच्या तळमजल्यावर पाणी जमा होत असल्याने इमारत नव्याने बांधण्याबाबत गृह मंत्री, महाराष्ट्र राज्य यांच्याकडे पत्रव्यवहार करुन प्रत्यक्ष पाहणी केली असतानाही कोणतीच कार्यवाही केली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीनुसार त्यात काय आढळून आले, तद्नुसार साकिनाका पोलीस ठाणे व साकिनाका वसाहतीचे काम बांधण्याकरिता ५०० कोटी निधीची तरतूद करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (१७-११-२०२२) : (१), (२), (३), व (४),

चांदिवली विधानसभा क्षेत्रातील साकिनाका पोलीस वसाहत व पोलीस ठाण्याची इमारत नादुरूस्त आहे हे खरे आहे, परंतु सदर प्रकरणी कोणतीच कार्यवाही झालेली नाही, हे खरे नाही.

न.भू.क्र.४१ अ, मौजे चांदिवली, घाटकोपर, अंधेरी (पूर्व), मुंबई उपनगर जिल्हा या भूखंडावरील म्हाडा इमारत क्रमांक १५ (अ,ब,क), १७ (अ, ब, क), २८ (अ, ब, क), २९ (अ, ब,क), ३०(अ,ब,क) अशा तळमजला + चार मजले अशा एकुण ५८५ सदनिका असलेल्या ५ निवासी इमारती म्हाडा कार्यालयाकडुन पोलीस विभागाकरीता मालकी तत्वावर खरेदी केलेल्या आहेत. त्यापैकी इमारत क्र. २८ (अ,ब,क) मधील तळमजला व पहिल्या मजल्यावरील सदनिकांमध्ये साकीनाका पोलीस ठाणे कार्यान्वीत आहे.

सदर ५ इमारतीच्या अंतर्गत गिलावा, लादीकरण, दरवाजे, खिडक्या, स्वयंपाकगृहाचे ओटे इत्यादी दुरुस्ती कामांसाठी दिनांक ०३/०७/२०१७ रोजी सार्वजनिक बांधकाम विभागास वितरीत केलेल्या रु.२,९३,१५,६८५/- इतक्या निधीमधून २५५ सदनिकांचे अंतर्गत दुरुस्ती कामकाज करण्यात आले असून उर्वरित ३३० निवासस्थानांच्या दुरुस्तीकरिता तसेच या ५ इमारतीच्या बाहय प्लास्टर, रंगकाम, छताचे वॉटरप्रुफींग, आणि ड्रेनेज लाईन इत्यादी दुरुस्तीच्या रु.२,१५,०४,७१०/- अंदाजपत्रकीय खर्चास माहे एप्रिल २०१९ मध्ये प्रशासकीय मान्यता दिली आहे.

तसेच सदर ५ इमारतीपैकी इमारत क्र. २८, २९ व ३० या इमारती सा.बां. विभागाने माहे मे-२०१९ मध्ये धोकादायक घोषित केल्यामुळे तसेच पावसाळ्याच्या अनुषंगाने सुरक्षिततेच्या दृष्टीने, तात्पुरत्या स्वरूपात स्थिरता व आधार देण्याकरिता रू.१०,४०,९७३/- इतक्या अंदाजपत्रकीय खर्चाच्या कामास मान्यता देऊन कामकाज सुध्दा पूर्ण झाले आहे.

उक्त नमूद पोलीस विभागाच्या पाच इमारतींचे सार्वजनिक बांधकाम विभागाने स्ट्रक्चरल ऑडीट केले असून त्यापैकी इमारत क्र. २८ (अ,ब,क), २९(अ,ब,क), ३० (अ,ब,क) या तीन इमारती धोकादायक असल्याचे आणि दुरुस्ती कामे करण्याच्या स्थितीत नसल्यामुळे सदर इमारती रिक्त करणेबाबत सार्वजनिक बांधकाम विभागाकडून दि.०८/०९/२०२० रोजी कळविल्यानुसार सदर इमारती तातडीने रिक्त करण्यात आल्या आहेत.

पोलीस स्टेशन स्थलांतरीत करण्याकरिता पोलीस उप आयुक्त, परिमंडळ - १०, मुंबई यांनी प्रत्यक्ष पाहणी केली असता मोहिली व्हिलेज, ता. कुर्ला, मुंबई न.भू.क्र.८३२/३/२ या आरक्षित भूखंडाची जागा साकीनाका पोलीस ठाणे कार्यक्षेत्राच्या मध्यवर्ती ठिकाणी असून पोलीस ठाणेकरिता आणि जनतेच्या दृष्टीने सोईस्कर असल्याने उक्त नमूद दोन्ही भूखंड कार्यालयीन / निवासी वापराकरिता आवश्यक असल्याने पोलीस विभागास हस्तांतरीत करणेबाबत पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई कार्यालयाने दि.०२/०९/२०२१ अन्वये बृहन्मुंबई महानगरपालिकेस विनंती केली आहे.

तसेच सदर जागा प्राप्त होईपर्यंत साकीनाका पोलीस ठाणेच्या हद्दीतील जनतेच्या दृष्टीने योग्य असलेल्या शिवशाही पुनर्वसन प्रकल्प मर्यादित, यांचेकडील चांदिवली येथील क्रिस्टल बिल्डींग मधील पहिल्या मजल्यावरील २० सदनिका तात्पुरत्या स्वरुपात भाडे तत्वावर घेऊन तेथे स्थलांतरीत करण्याची कार्यवाही सुरु आहे.

तसेच मुंबई मधील विविध २७ ठिकाणी म्हाडा वसाहतीतील जीर्ण झालेल्या पोलीस वसाहतीचा पुर्नविकास म्हाडामार्फत करण्यासाठी अपर मुख्य सचिव (गृह) यांच्या अध्यक्षतेखाली दि.२०/०९/२०२२ समिती गठित करण्यात आली आहे. त्यामध्ये चांदीवली येथील पोलीस वसाहतीचा समावेश आहे.

गिरगाव (ता.जत, जि.सांगली) येथे ऊसतोड मुकादमाचे अपहरण झाल्याबाबत

(१५) ४००४१ (०७-०४-२०२२). श्री.विक्रमसिंह सावंत (जत) : सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गिरगाव (ता.जत, जि.सांगली) येथे ऊसतोड मुकादमाचे कर्नाटकातील एका साखर कारखान्याच्या कराराप्रमाणे काम न केल्याने चार व्यक्तींनी अपहरण केल्याचे दिनांक ३० डिसेंबर, २०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी उमदी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यासंदर्भात चौकशी करुन अपहरणकर्त्यांचा शोध घेण्याबाबत व त्यांच्यावर कारवाई करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (११-११-२०२२) :(१) श्री.धनाप्पा मादर यांचे अपहरण झाल्याबाबतची त्यांचे वडील श्री. शरणाप्पा मादर यांनी तीन इसमांविरुध्द दिनांक २७.१२.२०२१ रोजी उमदी पोलीस स्टेशन येथे तक्रार केली आहे.

(२) सदर प्रकरणी उमदी पोलीस स्टेशन, तालुका जत येथे गु.र.नं.३००/२०२१ भा.द.वि. कलम ३६५,५०४,३४ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

(३) पोलीसांकडून अपहरीत व्यक्तीचा शोध घेण्यात आला असता सदर व्यक्ती मधोळ या गावी आढळून आली.

सदर घटनेबाबत पोलीसांनी त्यांच्याकडे अधिक चौकशी केली असता सदर व्यक्ती ही स्वत:च्या कामानिमित्त गेली होती व त्यांचे अपहरण झाले नसल्याचे पोलीसांना सांगितले व तसा जबाब नोंदविण्यात आला आहे.

सदर गुन्ह्याबाबत मा.न्यायालयात “क” समरी अहवाल दाखल करण्यात येत आहे.

(४) विलंब झालेला नाही.

महावितरण हडपसर ग्रामीण उपविभागांतर्गत असलेल्या वाघोली शाखा कार्यालयाचे विभाजन करण्याबाबत

(१६) ४००६८ (०९-०४-२०२२). अॅड.अशोक पवार (शिरुर), श्री.दिलीप मोहिते-पाटील (खेड आळंदी), श्री.चेतन तुपे (हडपसर) : सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे जिल्यातील हडपसर महावितरण ग्रामीण उपविभागांतर्गत वाघोली या शाखेमध्ये ७१ हजार महावितरणाचे ग्राहक

असून वाघोली हे गाव पुणे शहरानजिक असून लोकसंख्याही मोठया प्रमाणात वाढत असून वाघोलीचे क्षेत्र चाळीस किलोमिटरपेक्षा जास्त असून त्यामध्ये २७ उच्च् दाब वीज वाहिन्या कार्यरत असून वीज वाहिन्यांची सगळी मिळून एकूण लांबी कमीत कमी ३५० किलोमीटर आहे हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सद्यस्थितीत वाघोली शाखेमध्ये फक्त १ शाखा अभियंता व २३ कर्मचारी असल्याने या कर्मचाऱ्यांवर कामाचा ताण येत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, ग्राहकांच्या सोईकरिता महावितरण हडपसर ग्रामीण उपविभागांतर्गत वाघोली शाखा कार्यालयाचे विभाजनाचा प्रस्ताव शासन स्तरावर प्रलंबित असून या प्रस्तावाला मंजूरी देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (१५-११-२०२२) : (१) हे खरे आहे.
(२) हे खरे आहे.
(३) वरील प्रस्ताव विचाराधीन असून त्यावर उचित कार्यवाही सुरु आहे.
(४) प्रश्न उद्धवत नाही.

नगर परिषद देसाईगंज, (जि. गडचिरोली) येथील प्रधानमंत्री आवास योजना (शहरी) अंतर्गत प्रकल्प अहवाल तयार करुन नागरीकांना घरकुलाचा लाभ देण्याबाबत.

(१७) ४००७० (०१-०४-२०२२). श्री.कृष्णा गजबे (आरमोरी) : सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नगर परिषद देसाईगंज, (जि. गडचिरोली) येथील प्रधानमंत्री आवास योजना (शहरी) अंतर्गत आर्थिकदृष्टया दुर्बल घटक क्र.४ चा सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्याचे काम बंद असल्याने तेथील जवळपास ३०० लाभार्थी घरकुलाच्या लाभापासुन वंचीत असल्याचे माहे जानेवारी, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय ,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करुन घरकुलाचा लाभ लाभार्थींना देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (१६-११-२०२२) : (१) व (२)
देसाईगंज नगरपरिषदेत प्रधानमंत्री आवास योजना (शहरी) अंतर्गत घटक क्र.४ मध्ये तीन सविस्तर प्रकल्प अहवाल (DPR)मंजूर आहेत. त्यापैकी दोन सविस्तर प्रकल्प अहवाल (DPR) सन २०१९ मध्ये मंजूर करण्यात आले असून तिसरा सविस्तर प्रकल्प अहवाल (DPR) दिनांक ३०.०३.२०२२ रोजी मंजूर करण्यात आला आहे. पहिल्या दोन सविस्तर प्रकल्प अहवालांना (DPR) राज्य हिश्श्याचा १००% निधी व केंद्र हिश्श्याचा पहिल्या हप्त्याचा निधी वितरीत करण्यात आला आहे. त्याबाबतचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

परिशिष्ट अ (रू.लक्षात)

शहर	मंजुर घरकुल	केंद्र शासनाचा वितरीत निधी	राज्य शासनाचा वितरीत निधी
देसाईगंज	११६	६९.६०	११६.००
देसाईगंज	३९३	२३५.८०	३९३.००
देसाईगंज	३००	--	--
एकूण	८०९	३०५.४०	५०९.००

तिसऱ्या सविस्तर प्रकल्प अहवाल (DPR) ची माहिती MIS Portal वर भरल्यानंतर त्यानुषंगाने निधी वितरणाचा प्रस्ताव प्राप्त झाल्यावर राज्य हिश्श्याचा निधी वितरीत करण्याची कार्यवाही करण्यात येईल.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

नवापूर तालुक्यामधील (जि. नंदुरबार) भूरीवेल, पिप्राणे, नागन व भरडू प्रकल्पांतील पाणी वितरण व्यवस्था सुरळीत नसल्याबाबत

(१८) ४००८८ (०१-०४-२०२२). श्री.शिरीषकुमार नाईक (नवापूर) : सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नवापूर तालुक्यामधील (जि. नंदुरबार) भूरीवेल, पिप्राणे ,नागन , भरडू या प्रकल्पात पाणीसाठा पूर्ण झाला असतांनाही अद्यापी पाण्याची वितरण व्यवस्था केली नसल्यामुळे गत ४ वर्षांपासून शेतकऱ्यांना त्यांच्या शेतीसाठी व पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करण्यात आली नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उपरोक्त प्रकल्पांचे व्दितीय प्रशासकीय मान्यता मिळणेबाबतचा प्रस्ताव शासनाकडे सादर झालेला आहे काय,
(३) तसेच उपरोक्त प्रकल्पातून शेतकऱ्यांना शेतीसाठी व पिण्याच्या पाण्याची वितरण व्यवस्था पूर्ण करणेसाठी साधारणत: किती कालावधी व निधी लागणार आहे,
(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीअंती काय आढळून आले, त्यानुषंगाने उक्त तालुक्यातील उपरोक्त प्रकल्पांतर्गत पाण्याची वितरण व्यवस्था पूर्ण करण्याबाबत शासनाकडून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (१०-११-२०२२) :(१) व (२) अंशत: खरे आहे.

१) ल.पा.योजना भुरीवेल प्रकल्पाची घळभरणी सन २०१५ मध्ये पुर्ण करण्यात आली असुन ३.६५ द.ल.घ.मी. पाणीसाठा निर्मिती करण्यात आलेला आहे, प्रकल्पाचे वितरण प्रणालीचे कामाचा समावेश असलेला द्वितीय सुधारीत प्रशासकिय मान्यता प्रस्ताव शासनस्तरावर छाननी अंतर्गत आहे.

सुधारीत प्रशासकिय मान्यता प्राप्ती नंतर वितरण व्यवस्थेची कामे निधी उपलब्धतेनुसार १ वर्षात पुर्ण करण्याचे नियोजन आहे.

२) लघु पाटबंधारे योजना पिंप्राणे प्रकल्पाचे काम खाजगी जमीनी संपादनास प्रकल्पग्रस्तांच्या विरोधामुळे धरणाच्या भौतिक कामास अद्याप सुरुवात झालेली नाही.

३) नागन (भरडु) मध्यम प्रकल्पाची घळभरणी सन २०१४ मध्ये पुर्ण करण्यात आली असुन २६.४८ द.ल.घ.मी. पाणीसाठा निर्मिती करण्यात आलेला आहे, प्रकल्पाचे वितरण प्रणालीचे कामाचा समावेश असलेला चतुर्थ सुधारीत प्रशासकिय मान्यता प्रस्तावावर नियोजन व वित्त विभागाने उपस्थित केलेल्या शेऱ्यांची पूर्तता करणेची कार्यवाही क्षेत्रिय स्तरावर प्रगतीत आहे.

सुधारीत प्रशासकिय मान्यता प्राप्ती नंतर वितरण व्यवस्थेची कामे निधी उपलब्धतेनुसार २ वर्षात पुर्ण करण्याचे नियोजन आहे.

(३) १) लघु पाटबंधारे योजना भुरीवेल प्रकल्पाची वितरण प्रणाली बंदिस्त नलिका वितरण प्रणालीने प्रस्तावित असुन प्रकल्पाच्या सुधारीत प्रशासकिय मान्यता प्रस्तावामध्ये वितरण व्यवस्थेसाठी रु.७.८९ कोटीची तरतुद करण्यात आलेली आहे. सुधारीत प्रशासकिय मान्यता प्राप्ती नंतर वितरण व्यवस्थेची कामे निधी उपलब्धतेनुसार १ वर्षात पुर्ण करण्याचे नियोजन आहे. २) पिंप्राणे लघु पाटबंधारे योजनेच्या कामासाठी प्रकल्पग्रस्तांचे मने वळवून आवश्यक भूसंपादन कार्यवाही पूर्ण करण्याचे नियोजन आहे. भुसंपादनानंतर प्रकल्पाची कामे सुरु करणे शक्य आहे.

३) नागन (भरडु) मध्यम प्रकल्पाचा डावा कालवा बंदिस्त नलिका वितरण प्रणालीने प्रस्तावित असुन या कामा करिता प्रकल्पाच्या सुधारीत प्रशासकिय मान्यता प्रस्तावामध्ये रु.२७.७४ कोटीची तरतुद करण्यात आलेली आहे. व उजवा मुख्य कालव्याचे पारंपारीक पद्धतीने १ ते ४ कि.मी. लांबीतील काम पुर्ण झाले असुन त्यावरील वितरीकांची कामे बाकी आहेत. उर्वरित कामाकरिता प्रकल्पाच्या सुधारीत प्रशासकिय मान्यता प्रस्तावामध्ये वितरण व्यवस्थेसाठी रु.१.७८ कोटी ची तरतुद करण्यात आलेली आहे. सुधारीत प्रशासकिय मान्यता प्राप्ती नंतर वितरण व्यवस्थेची कामे निधी उपलब्धतेनुसार २ वर्षात पुर्ण करण्याचे नियोजन आहे.

(४) १) लघु पाटबंधारे योजना भुरिवेल प्रकल्पाचा द्वितीय सुधारीत प्रशासकीय मान्यता प्राप्त झाल्यानंतर कालव्याचे कामे बंदिस्त नलिका प्रणालीने करावयाचे प्रस्तावित आहे.

२) पिंप्राणे लघु पाटबंधारे योजनेचे कामे भूसंपादना अभावी प्रलंबित आहे. भूसंपादनाची कार्यवाही पूर्ण झाल्यावर योजनेच्या कामास सुरूवात करण्यात येईल.

३) नागन (भरडू) प्रकल्पाच्या उजव्या मुख्य कालव्याचे कि.मी. १ ते ४ लांबीतील काम पुर्ण झालेले असून त्यावरील वितरीकांची कामे बाकी आहेत. उर्वरीत कामे करण्यासाठी चतुर्थ सुधारित प्रशासकीय मान्यता प्राप्त झाल्यानंतर डाव्या कालव्याचे काम बंदिस्त नलिका प्रणालीने करावयाचे प्रस्तावित आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

आटपाडी (जि.सांगली) येथील पोलीस ठाण्याच्या इमारतीची अत्यंत दुरावस्था झाल्याबाबत

(१९) ४०१११ (१२-०४-२०२२). श्री.अनिल बाबर (खानापूर) : सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आटपाडी (जि.सांगली) येथील पोलीस ठाण्याच्या इमारतीची अत्यंत दुरावस्था झाल्याचे माहे जानेवारी, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी पोलीस ठाणे इमारतीचे नुतनीकरण तातडीने करण्याकरीता स्थानिक लोकप्रतिनिधींनी अनेक निवेदने दिली आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर इमारतीचे नुतनीकरण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (१७-११-२०२२) : (१), (२) व (३) आटपाडी पोलीस ठाणे प्रशासकीय इमारतीचे बांधकाम करण्याबाबतचा प्रस्ताव महाराष्ट्र राज्य पोलीस गृहनिर्माण व कल्याण महामंडळाकडे सादर करण्यात आलेला असून, त्यानुषंगाने महामंडळाने तज्ञ बांधकाम विश्लेषक, प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार यांची नियुक्ती केली आहे. तसेच बांधकामाचे अंदाजपत्रक व आराखडे तयार करण्यात आले आहेत. त्यानुसार महाराष्ट्र राज्य पोलीस गृहनिर्माण व कल्याण महामंडळाकडून सदर प्रकल्पाचे बांधकामाकरिता प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. दि.१२/०१/२०२२ रोजी शासनाकडून सदर प्रकल्पास प्राधान्यक्रम देण्यात आला असून निधीच्या उपलब्धतेनुसार पुढील कार्यवाही करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

अंबरनाथ(जि.ठाणे) येथील पालेगाव औद्योगिक क्षेत्रातील भूखंड महावितरणाच्या सबस्टेशन उभारणी करिता देण्याबाबत

(२०) ४०१२८ (०९-०४-२०२२). डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ) : सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अंबरनाथ (जि.ठाणे) येथील पालेगाव औद्योगिक क्षेत्रातील भूखंड महावितरणाच्या सबस्टेशन उभारणी करिता देण्यात यावा अशी लेखी मागणी स्थानिक लोकप्रतिनिधीनी उर्जा मंत्री यांच्याकडे दिनांक २० जानेवारी, २०२१ रोजी वा त्यासुमारास केली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर निवेदनाच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. देवेंद्र फडणवीस (१०-११-२०२२) : (१) होय हे खरे आहे.
(२) अंबरनाथ येथील पालेगाव औद्योगिक क्षेत्रात नविन २२/२२ केव्ही स्विचिंग स्टेशन प्रस्तावित करण्यात आले असून या स्विचिंग स्टेशनसाठी लागणारी जागा महाराष्ट्र राज्य औद्योगिक विकास महामंडळाकडून राखीव ठेवण्यात आली आहे. सदर जागा महावितरणकडे अद्याप सुपूर्द करण्यात आलेली नाही. उपरोक्त भूखंड अधिग्रहित करण्याबाबत महावितरणकडून पाठपुरावा करण्यात येत आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

घाटंजी (ता.पारवा, जि.यवतमाळ) येथे पोलीस ठाणे हद्दीत कुर्ली येथील
विदर्भ कोकण बँकेत अपहार झाल्याबाबत

(२१) ४०१४० (१२-०४-२०२२). डॉ.संदीप धुर्वे (अर्णी) : सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय:-
(१) घाटंजी (ता.पारवा, जि.यवतमाळ) येथे पोलीस ठाणे हद्दीतील विदर्भ कोकण ग्रामीण बँक शाखा कुर्ली येथे खातेदारांनी जमा केलेले पैसे खात्यामध्ये न भरता परस्पर रोखपालाकडे ठेवून अपहार केला, हे खरे आहे काय,
(२) तसेच सन २०१९-२०२० या कालावधीत सदर बँकेत रक्कम जमा करुनही त्यांच्या खात्यामध्ये रक्कम जमा झाली नाही तसेच याप्रकरणी संबंधित बँक कर्मचाऱ्यांविरुद्ध गुन्हा दाखल झाला असून तपास सुरु आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (१७-११-२०२२) : (१) व (२) होय
(३) फिर्यादी यांनी सन २०१९-२०२० मध्ये अनुक्रमे रुपये ५०,०००/- व रुपये ४९,९९९/- असे एकूण रुपये ९९,९९९/- विदर्भ कोकण ग्रामीण बँक, शाखा कुर्ली येथे आपआपल्या खात्यात जमा करणे करीता विश्वासाने टाकले असता आरोपी रोखपाल याने फिर्यादी यांच्या खात्यात सदर रक्कम जमा न करता विश्वासघात करुन फसवणूक केल्याने पोलीस स्टेशन पारवा येथे गु.र.नं.२४/२०२२ कलम ४०९, ३४ भादंवि प्रमाणे गुन्हा नोंदविला आहे. सदर गुन्हयाच्या तपासात आरोपीने फिर्यादी व इतर लोकांचे एकूण रु.२५,६२,४१४/- रुपयाचा अपहार केल्याचे निष्पन्न झाले असून गुन्हयाचा तपास सुरु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

हिंगोली जिल्ह्यात गत दोन वर्षांपूर्वी बसविण्यात आलेल्या विदयुत रोहित्राची चाचणी घेण्यात न आल्याबाबत

(२२) ४०१६४ (२८-०३-२०२२). श्री.संजय केळकर (ठाणे) : सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) हिंगोली जिल्ह्यातील व शहरातील काही भागात गत दोन वर्षांपूर्वी विदयुत रोहित्रे बसविण्यात आले असून त्याची चाचणीसुद्धा अद्यापपर्यंत घेण्यात न आल्याने अनेक रोहित्रे वापराविना पडून असल्याची बाब माहे जानेवारी २०२२ , मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली , हे खरे आहे काय,
(२) असल्यास, डीपीचे वितरण न झाल्याने लाखो रुपयांचा शासनाने केलेला खर्च वाया जाण्याची शक्यता निर्माण झाली आहे हे खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त रोहित्रे तात्काळ सुरु करून शासकीय विदयुत पुरवठा सुरळीत करण्याची मागणी नागरिकांकडून होत असतानाही त्याकडे दुर्लक्ष करणाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई तसेच रोहित्र उपलब्ध करुन विदयुत पुरवठा सुरळीत करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. देवेंद्र फडणवीस (१०-११-२०२२) : (१) हे खरे नाही.
(२) हे खरे नाही.
(३) हिंगोली मंडळामध्ये गत दोन वर्षात विविध योजने अंतर्गत ४६२३ इतक्या रोहित्रांची कामे करण्यात आलेली असून सदरील कामांची तपासणी विद्युत निरीक्षकांकडून केल्यानंतर कार्यान्वित करण्यात आलेली आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

दानापूर (ता. भोकरदन, जि.जालना) येथील जळालेले रोहित्र दुरुस्त करण्याबाबत

(२३) ४०१९६ (२८-०३-२०२२). श्री.संतोष दानवे (भोकरदन) : सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) दानापूर (ता. भोकरदन, जि.जालना) येथील रोहित्र जळाल्याने महिनाभरापासून अर्धे गांव अंधारात असल्याची बाब माहे जानेवारी, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, महावितरण कंपनीचे अभियंता विदयुत रोहीत्र दुरुस्त करण्यासाठी लागणारे तेल मिळत नसल्याचे कारण सांगत आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, विदयुत रोहित्र वेळेवर दुरुस्त करुन मिळत नसल्याने शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान होत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन, रोहित्र दुरुस्त किंवा नवीन रोहित्र उपलब्ध करुन देण्याच्या दृष्टिने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (११-११-२०२२) : (१) व (२) हे खरे नाही.
सन २०२१-२०२२ (दि.०१.०४.२०२१ ते दि. १७.०२.२०२२ पर्यंत) मध्ये जालना मंडळास एकूण २५१ किलोलिटर ऑईल उपलब्ध करून देण्यात आलेले आहे. उपलब्ध करून देण्यात आलेल्या ऑईलपैकी ५२ किलोलिटर ऑईलचा साठा दि.१७.०२.२०२२ रोजी जालना मंडळ कार्यालयातील भांडारामध्ये उपलब्ध आहे..
(३), (४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

सिरसम (जि.हिंगोली) येथे अवैध गैरकारभारांवर आळा घालण्याबाबत

(२४) ४०२०७ (०७-०४-२०२२). श्री.माधवराव पवार (हदगाव) : सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सिरसम (जि.हिंगोली) येथील परिसरात स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने तीन मटका जुगार या अवैध गैरकारभारावर दिनांक ८ जानेवारी, २०२२ रोजी वा त्यासुमारास छापा टाकून कारवाई केली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर तालुक्यात वासंबा ठाणे हद्दीतील सर्रास मटका जुगाराचे अवैध गैरकारभार सुरु असताना स्थानिक पोलिसांकडून दुर्लक्ष होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याप्रकरणी चौकशी करुन अवैध गैरकारभारांना आळा घालण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (११-११-२०२२) :(१) होय हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.
(३) हिंगोली जिल्ह्यातील अवैध धंद्यांना प्रतिबंध करण्यासाठी विशेष मोहिम राबवून दारुबंदी, मटका जुगार, वाळूचोरी व गुटखा संबंधीच्या गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

अवैध धंद्यांची माहिती देण्याकरीता पोलीस अधीक्षक, हिंगोली यांचा मोबाईल नंबर वृत्तपत्रामध्ये तसेच सोशल मिडियावर प्रसिध्द करण्यात आला आहे.

(४) विलंब झालेला नाही.

बुलढाणा जिल्ह्यात स्त्री-पुरूषांचे बेपत्ता होण्याचे प्रमाण वाढत असल्याबाबत

(२५) ४०२५१ (१२-०४-२०२२). श्रीमती श्वेता महाले (चिखली), श्री.संजय गायकवाड (बुलढाणा) : सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बुलढाणा जिल्ह्यात गतवर्षी ८०० पेक्षा जास्त स्त्री-पुरुष बेपत्ता झाल्याची गंभीर आकडेवारी माहे जानेवारी, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी जवळपास पंधरा जण बेपत्ता झाल्याची घटना माहे जानेवारी, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मागील वर्षी किती जण बेपत्ता झाले व त्यातील किती जणांचा तपास लागला याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (१५-११-२०२२) : (१) होय.

(२) बुलढाणा जिल्हयात माहे, २०२२ या वर्षामध्ये विविध पोलीस स्टेशनमध्ये ७४ स्त्री-पुरुष बेपत्ता झाल्याबाबत मिसींग दाखल आहेत.

(३) सन २०२१ मध्ये ९९० बेपत्ता स्त्री-पुरुषांपैकी ७२९ स्त्री-पुरुष मिळून आलेले आहेत. बेपत्ता महिला/मुलींचा शोध घेण्यासाठी खालीलप्रमाणे उपाययोजना राबविण्यात येत आहेत :

१. महिला/मुलींच्या तक्रारींचे वेळेत निवारण करण्यासाठी जिल्हास्तरावर १०९१ नंबरची हेल्पलाईन तसेच प्रतिसाद ॲप सुरु करण्यात आले आहे.

२. महिला/मुलींच्या छेडछाडींना आळा घालण्यासाठी दामिणी पथक तयार करण्यात आले आहे.

३. महिला/मुलींनी रात्री अपरात्री मदत मागितल्यास त्यांना सुरक्षितस्थळी पोहचविण्याचे आदेश सर्व पोलीस स्टेशनला देण्यात आले आहेत.

४. हरवलेल्या बालके, मुली, स्त्री, पुरुष यांची माहिती www. trackthemissingchild.gov.in या वेबसाईटवर भरुन सदर प्रकरणाचा सखोल तपास करण्यात येतो.

५. हरवलेल्या मुलींच्या शोध घेण्याकरीता प्रसारमाध्यमांतून प्रसिध्द करण्यात येऊन तपास करण्यात येतो.

६. हरवलेल्या बालकांचा शोध घेण्यासाठी ऑपरेशन मुस्कान राबविण्यात येते.

(४) प्रश्न उद्धवत नाही.

राज्यातील पाणीपुरवठा योजना, सार्वजनिक पथदिव्ये आणि कृषि वीज पंपाची वीजबिलाच्या थकीत अनुदानाची रक्कम त्वरित देण्याबाबत

(२६) ४०२६९ (२८-०३-२०२२). श्री.किशोर जोरगेवार (चंद्रपूर), श्री.चंद्रकांत (भाऊ) निंबाजी पाटील (मुक्ताईनगर), श्री.संजय गायकवाड (बुलढाणा), श्री.लक्ष्मण जगताप (चिंचवड), डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा), श्री.प्रताप सरनाईक (ओवळा माजिवडा), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.राम कदम (घाटकोपर पश्चिम), श्री.रवि राणा (बडनेरा), श्री.अभिमन्यु पवार (औसा) : सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील पाणीपुरवठा योजनांकडे २ हजार ६०७ कोटी, सार्वजनिक पथदिव्यांचे ६ हजार ३१६ कोटी आणि कृषि वीज पंपाचे ४१ हजार १७५ कोटी इतक्या वीजबिलाचे थकीत अनुदान त्वरित देण्याची मागणी मा. ऊर्जा मंत्री यांनी मा. मुख्यमंत्री यांचेकडे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (१०-११-२०२२) : (१)हे अंशत: खरे आहे.
सद्यस्थितीत नगरविकास व ग्रामविकास विभागांतर्गत पाणीपुरवठा योजनांकडे महावितरणचे सुमारे रु. २६१३ कोटी, सार्वजनिक पथदिव्यांचे रु. ६३४८ कोटी देयकापोटी थकीत आहेत. सदर थकबाकी भरणा करणेबाबत संबंधित विभागाकडे निधी उपलब्ध करणेसाठी पाठपुरावा करण्यात येत आहे. तसेच कृषी वीज पंप ग्राहकांकडे रु. ४२७४१ कोटी थकबाकी आहे.
(२) सदर थकबाकी भरणा करणेबाबत संबंधित विभागाकडे पाठपुरावा करण्यात येत आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

उस्मानाबाद जिल्हयातील उच्च दाब वाहीनीची कामे मे.ओल्टास लि.मुंबई या कंपनीने वेळेत पूर्ण केली नसल्याबाबत

(२७) ४०२९४ (०९-०४-२०२२). श्री.कैलास घाडगे पाटील (उस्मानाबाद) : सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) उस्मानाबाद जिल्हयातील उच्च दाब वाहीनीची कामे मे.ओल्टास लि.मुंबई या कपंनीला माहे ऑक्टोबर ,२०१८ मध्ये दिली असून सदरहू कामे जानेवारी,२०२० पर्यत पूर्ण करण्याबाबतचा करारनामा झालेला असतांनाही कामे मुदतीत पुर्ण न झाल्याने सदरहू कंपनीला तीन वेळा अनुक्रमे माहे जाने,२०२०, डिसेंबर,२०२१ आणि २०२२ मध्ये मुदतवाढ देण्यात आली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू कंपनीला तीन वेळेस मुदतवाढ देऊनही अद्यापपर्यत कामे पुर्ण केली नसल्याचे निदर्शनास आले , हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, मुदतीत कामे पूर्ण न केल्याने कंपनीला दंड लावण्यात येऊन कंपनीला काळ्या यादीत टाकण्याची कारवाई करण्यात आली आहे काय,
(४) असल्यास, उच्च दाब वाहीनी चे काम त्वरीत पूर्ण करण्याच्या दृष्टिने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत,

श्री. देवेंद्र फडणवीस (१५-११-२०२२) : (१) होय, हे खरे आहे.
(२) होय, हे खरे आहे.
(३) कृषीपंप वीज जोडणी देण्याच्या कामामध्ये असमाधानकारक प्रगती असल्याने कार्यादेश रद्द करण्याकरिता व काळया यादीत नाव समाविष्ट करण्याकरिता मे. व्होल्टास लि. या कंपनीला नोटिस-टू-टर्मिनेट देण्यात आली आहे.
(४) वेळोवेळी आढावा बैठक घेऊन कामाची गती वाढविण्याच्या सुचना दिल्या आहेत आणि वारंवार कामाचा पाठपुरावा करण्यात येत आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

जळगाव शहरामध्ये गेल्या ३० ते ३५ वर्षांपासूनची विद्युत वाहिनी तसेच खांब जीर्ण झाले असल्याबाबत

(२८) ४०३०५ (१९-०४-२०२२). श्री.सुरेश (राजूमामा) भोळे (जळगाव शहर) : सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जळगाव शहरामध्ये गेल्या ३० ते ३५ वर्षांपासूनची विदयुत वाहिनी तसेच खांब जीर्ण झाले असल्याचे निदर्शनास आले असून उक्त जीर्ण विदयुत वाहिनी तसेच खांब यांची शासनाने पाहणी केली आहे काय, त्यात काय निदर्शनास आले,

(२) असल्यास, भाग १ मधील विदयुत वाहिणी व जीर्ण खांब दुरुस्त करण्याबाबत निधी मिळण्यासाठी शासनाने कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहेत,
(३) नसल्यास , विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. देवेंद्र फडणवीस (११-११-२०२२) : (१) हे अंशत: खरे आहे.
जळगाव शहरातील जीर्ण विद्युत वाहिनी व खांबांची महावितरण कंपनीमार्फत पाहणी करण्यात आलेली आहे व काही ठिकाणी विद्युत वाहिनी तसेच खांब जीर्ण झाल्याचे निदर्शनास आले आहे.
(२) जळगाव शहरातील विद्युत यंत्रणा बळकटीकरण करण्याकरीता एकात्मिक ऊर्जा विकास योजना (IPDS Scheme) अंतर्गत काही कामे करण्यात आलेली आहेत व उर्वरित कामे सुधारीत वितरण क्षेत्र (आर. डी. एस.एस.) योजनेअंतर्गत प्रस्तावित आहेत.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

श्रीरामपूर (जि.अहमदनगर) तालुक्यातील अनेक गावांमध्ये विज वाहिन्या तुटल्याबाबत

(२९) ४०४६१ (१९-०४-२०२२). श्री.लहू कानडे (श्रीरामपूर) : सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) टाकळीभान ,पडेगाव ,बेलापूर बुद्रुक ,मारुंजी , देवळाली प्रवरा ,कारेगाव (ता.श्रीरामपूर, जि.अहमदनगर) गावांमध्ये शेतातून जाणाऱ्या विज वाहिन्या तुटल्यामुळे किंवा शॉर्टसर्किटमुळे आगी लागून शेकडो एकर ऊस व इत्यादी पिके जळाल्याने शेतकऱ्यांचे नुकसान झाले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शेतातून जाणारी विदयुत वाहिनी सदोष असल्यामुळे व वाहिन्या लोंबत असल्यामुळे असे अपघात वारंवार होतात, हेही खरे आहे काय,
(३) असल्यास, दोन पोल मधील अंतर हे वीज महामंडळाच्या निकषांमध्ये नसणे आणि जमीन डीप ब्लॅक सॉईल असून पोल उभे करताना आवश्यक ती ट्रीटमेंट न केल्याने एल टी लाईन झुकणे व पोल कलंडणे यामुळे शॉर्टसर्किट व आगी लागत असल्याचे निदर्शनास आले हे खरे आहे काय,
(४) असल्यास, शॉर्टसर्किट व आग लागून होणारे अपघात टाळण्याच्या दृष्टिने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (१०-११-२०२२) : (१) हे अंशत: खरे आहे.
श्रीरामपूर विधानसभा मतदारसंघातील (जि. अहमदनगर) नमुद केलेल्या गावात सन २०२१-२२ मध्ये एकुण ९ विविध ठिकाणी आग लागल्याची नोंद आहे. सदर अपघातामुळे एकुण अंदाजे २२ एकरातील पीक क्षेत्र बाधित झाले.
(२) हे अंशत: खरे आहे.
विद्युत प्रणालीत अचानकपणे आलेल्या तांत्रिक बिघाडामुळे तसेच नैसगिक आपत्ती जसे की, वादळ, वारा, पाऊस, अतिवृष्टी, वीज चमकणे यामुळे अपघात घडण्याची शक्यता असते.
(३) हे अंशत: खरे आहे.
(४) महावितरणच्या प्रणालीचे प्रतिबंधात्मक निगा व देखभाल दुरुस्तीची (Preventive Maintenance) कामे वेळापत्रकानुसार व आवशकतेनुसार नियमीतपणे केली जातात. तसेच लघुदाब वाहिनीवर Spacer बसवणे, मिडपोल उभा करणे, पोल मफिंग करणे, पोल बदलणे, गार्डींग करणे, वीज वाहिनी लगतच्या झाडाच्या फांद्या तोडणे इत्यादी कामे केली जातात. सन २०२१-२२ मध्ये नमूद गावामध्ये एकुण रु.१,६३,०००/- इतक्या रक्कमेची कामे करण्यात आलेली आहेत.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

सोनगीर (ता.जि.धुळे) हे मुंबई-आग्रा महामार्गावर पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांसाठी बांधलेल्या निवासस्थानांची दुरावस्था झाल्याबाबत

(३०) ४०४६२ (१२-०४-२०२२). श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण) : सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोनगीर (ता.जि.धुळे) हे मुंबई-आग्रा महामार्गावर वसलेले गाव असून याठिकाणी पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांसाठी बांधलेल्या निवासस्थानांची अत्यंत दुरावस्था झाल्याचे दिनांक २४ जानेवारी, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी पोलीस अधिकारी व कर्मचारी यांच्या निवासस्थान बांधकामासाठी निधीची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी शासनाकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू मागणीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (१७-११-२०२२) : (१) होय.

सदर निवासस्थान जीर्ण झालेले असून त्यांची पडझड झालेली आहे ते राहण्यायोग्य नसल्याने तेथे कोणीही कर्मचारी राहत नाहीत.

(२) स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी पोलीस वसाहतीबाबत शासनाकडे निधीची मागणी केल्याचे पत्र पोलीस अधीक्षक, धुळे, कार्यालयास प्राप्त झालेले नाही.

(३) पोलीस ठाणे, सोनगीर यांचे पत्र दि.१५.०४.२०२२ अन्वये सोनगीर पोलीस ठाणे येथील अधिकारी व अंमलदार यांचेकरिता निवासस्थान बांधकाम करणेबाबतचे अंदाजपत्रक तयार करुन मिळणेबाबत सार्वजनिक बांधकाम विभागास पत्रव्यवहार पोलीस अधीक्षक, धुळे यांचेकडून करण्यात आलेला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

राजुरा (जि.चंद्रपूर) येथील पोलीस ठाणे इमारत तसेच अधिकारी व कर्मचारी यांच्या वसाहतीच्या दुरावस्थेबाबत

(३१) ४०४८७ (१२-०४-२०२२). श्री.सुभाष धोटे (राजूरा) : सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राजुरा (जि.चंद्रपूर) येथील पोलीस ठाणे इमारत तसेच अधिकारी व कर्मचारी यांच्या वसाहतीची अत्यंत दुरावस्था झाल्याचे माहे जानेवारी, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी पोलीस ठाणे इमारतीचे तसेच अधिकारी व कर्मचारी यांच्या निवासस्थानाचे बांधकाम तातडीने करण्याकरिता निधी मंजुर करण्यासाठी स्थानिक लोकप्रतिनिधींनी निवेदने दिली आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच उक्त प्रकरणी गृह मंत्री, महाराष्ट्र राज्य यांना दिनांक २२ फेब्रुवारी, २०२१ रोजी व त्यासुमारास स्थानिक लोकप्रतिनिधींनी पत्रव्यवहार करुनही कोणतीच कार्यवाही करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर पोलीस ठाणे इमारत बांधकाम व कर्मचारी वसाहत बांधकामाबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (१७-११-२०२२) : (१) व (२) होय.

(३) व (४) हे खरे नाही.

महाराष्ट्र राज्य पोलीस गृहनिर्माण व कल्याण महामंडळाच्या, संचालक मंडळाने राजुरा येथे पोलीस ठाणे इमारत व १०१ पोलीस निवासस्थानांच्या कामाकरिता गृह विभागाकडून अतिरिक्त निधी उपलब्ध करुन घेण्याच्या अधीन राहून

मान्यता देण्यात आली आहे. गृह विभाग, महाराष्ट्र शासन यांचे पत्र दिनांक १२/०१/२०२२ अन्वये राज्यातील ८७ पोलीस ठाणे इमारत बांधकामाच्या प्राथम्यक्रम यादीस मान्यता प्रदान करण्यात आली आहे असून सदर यादीमध्ये पोलीस ठाणे राजुरा प्रशासकीय इमारतीचे काम अंतर्भूत आहे.
पोलीस गृहनिर्माण महामंडळाद्वारे पोलीस अधीक्षक, चंद्रपूर यांचेकरिता पोलीस ठाणे राजूरा प्रशासकीय इमारतीच्या बांधकामकरिता प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार यांची नियुक्ती करण्यात आली असून प्रकल्पाचे सर्वेक्षण आराखडे व नकाशे बनविण्याचे काम प्रगतीपथावर आहे.

पोलीस ठाणे, राजुरा येथील अधिकारी/ अंमलदार यांचेकरिता निवासस्थान बांधकामास प्राधान्यक्रम ठरविण्याची कार्यवाही विचाराधीन आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

नवापूर तालुक्यामधील (जि.नंदुरबार) जीर्ण झालेल्या व लोंबकळणाऱ्या विदयुत तारांबाबत.

(३२) ४०४९१ (१९-०४-२०२२). श्री.शिरीषकुमार नाईक (नवापूर) : सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नवापूर तालुक्यामधील (जि.नंदुरबार)आदिवासी भागांत जीर्ण होऊन लोंबकळत असलेल्या विद्युत वाहिन्यांमुळे अपघात होण्याची शक्यता असल्याचे निदर्शनास आले आहे,
(२) असल्यास, सदरहू विद्युत वाहिन्या बदलण्याबाबत महावितरणने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) उक्त जीर्ण झालेल्या व लोंबकळणाऱ्या विदयुत वाहिन्या बदलण्यासाठी किती कालावधी लागणे अपेक्षित आहे?

श्री. देवेंद्र फडणवीस (१४-११-२०२२) : (१) हे अंशत: खरे आहे.
नवापूर तालुक्यामधील आदिवासी भागात जीर्ण होऊन लोंबकळत असलेल्या विद्युत वाहिन्यांची महावितरण कंपनीमार्फत पाहणी करण्यात आलेली आहे.
(२) नवापूर तालुक्यातील आदिवासी भागातील लोंबकळत असलेल्या तारा सध्या महावितरणच्या निवड सुचिबध्द कंत्राटदारामार्फत देखभाल व दुरुस्ती योजनेअंतर्गत लहान चिंचपाडा, खेकडा, वडकुट, कोलदा, नवापूर नदीकाठ, उकलपाणी, लक्कडकोट इ. ठिकाणी आवळून दुरुस्त करण्यात आलेल्या आहेत. तसेच चौकी, डोकारे, बिलबारा, उंबर्डे, भामरमल, वडकुट या अत्यावश्यक ठिकाणी मध्य पोल टाकून लोंबकळत असलेल्या तारांना उंच करुन ताण देण्यात आलेला आहे. उर्वरित अत्यावश्यक लोंबकळत असलेल्या तारा व जीर्ण तारा चालु असलेल्या मान्सून देखभाल व दुरुस्तीअंतर्गत पूर्ण करण्यात येत आहेत. तसेच उर्वरित सर्व कामे सुधारीत वितरण क्षेत्र (आर.डी.एस.एस.) योजनेअंतर्गत प्रस्तावित केले आहे.
(३) सदर लोंबकळत असलेल्या तारा आवळून घेण्याची कामे सध्या चालू असलेल्या पुर्व मान्सून देखभाल व दुरुस्तीच्या कामामध्ये पूर्ण करण्यात येत आहेत. तसेच सुधारित वितरण क्षेत्र (आर.डी. एस.एस.) योजनेअंतर्गत प्रस्तावित केलेली कामे मंजुरीनुसार पूर्ण करण्यात येतील.

राज्यात बिरसा मुंडा योजनेअंतर्गत आदिवासी क्षेत्रातील शेतकऱ्यांना स्वतंत्ररित्या विज रोहित्र देण्याबाबत

(३३) ४०५७४ (३०-०३-२०२२). डॉ.किरण लहामटे (अकोले) : सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात बिरसा मुंडा योजनेअंतर्गत आदिवासी क्षेत्रातील शेतकऱ्यांना स्वतंत्ररित्या विज रोहित्र दिले जात असल्याने प्रत्येक शेतकऱ्यांना स्वतंत्र विज रोहित्र दिल्यामुळे शासनाच्या खर्चात वाढ होत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर स्वतंत्र विज रोहित्र न देता पूर्वीच्याच योजनेनुसार प्रत्येक शेतकऱ्यांना ग्रुप करुन विज रोहित्र देण्याबाबत शासनाने कोणता निर्णय घेतला आहे व त्याचे स्वरुप काय आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. देवेंद्र फडणवीस (१०-११-२०२२) : (१) हे खरे आहे.
ऊर्जा विभागाच्या उच्चदाब वितरण प्रणाली योजनेतर्गत स्वतंत्र रोहित्राव्दारे ग्राहकांना वीज पुरवठा केल्यामुळे ग्राहकास शाश्वत व अखंडीत वीज पुरवठा होण्यात मदत होते. सदर योजनेमध्ये उच्चदाब वाहिनी उभारुन तसेच ग्राहकाच्या विद्युत भारानुसार रोहित्राची क्षमता ठरवून कृषीपंप विद्युतीकरण करण्यात येते.
(२) कृषीपंप वीज जोडणी धोरण-२०२० अन्वये ज्या अर्जदारांच्या विहिरीचे अंतर नजीकच्या अस्तित्वात असलेल्या लघुदाब वाहिनीपासून ३० मीटरच्या आत आहे व त्या रोहित्रावर पर्याप्त क्षमता उपलब्ध असल्यास अशा नवीन कृषीपंप अर्जदारांना ३० दिवासाच्या आत वीज जोडणी देण्यात येत आहे. तसेच ज्या अर्जदारांना विहिरीचे अंतर अस्तित्वात असलेल्या लघुदाब वाहिनीच्या पोलपासून ३१ ते २०० मीटरच्या आत आहे व त्या रोहित्रावर पर्याप्त क्षमता उपलब्ध आहे, अशा सर्व कृषीपंप अर्जदारांना एरियल बंच केबलव्दारे वीज जोडणी देण्यात येत आहे. जर रोहित्रावर पर्याप्त क्षमता उपलब्ध नसल्यास, तेथील कृषीपंप ग्राहकांच्या समूहाला कृषीपंप वीज जोडणी धोरण-२०२० नुसार संबंधित रोहित्राची क्षमता वाढ करुन एरियल बंच केबल वाहिनीव्दारे नवीन कृषीपंपांना वीज पुरवठा करण्यात येतो.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

खोडाळा (ता. मोखाडा, जि. पालघर) येथील नवीन वीज उपकेंद्राचे काम प्रलंबित असल्याबाबत

(३४) ४०६२४ (२८-०३-२०२२). श्री.संजय केळकर (ठाणे) : सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) खोडाळा (ता. मोखाडा, जि. पालघर) येथील परिसरात असलेल्या पाड्यातील नवीन वीज उपकेंद्रातील २६ कामे मागील ३ वर्षांपासून प्रलंबित असल्याने ही कामे तातडीने पूर्ण करण्याबाबत स्थानिक नागरिकांनी तसेच लोकप्रतिनिधींनी दिनांक १४ जानेवारी, २०२२ रोजी वा त्या सुमारास लेखी निवेदनाद्वारे मागणी केली आहे हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त निवेदनाच्या अनुषंगाने शासनाने वीज उपकेंद्राचे काम लवकरात लवकर पूर्ण करण्यासाठी नियोजन करून विशेष निधी उपलब्ध करून देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. देवेंद्र फडणवीस (१५-११-२०२२) :(१) हे खरे आहे.
३३/२२ के. व्ही. खोडाळा उपकेंद्राच्या कामांमध्ये एकूण २५ त्रुटी आढळल्या होत्या व त्या पूर्ण करण्याबाबत स्थानिक नागरिकांनी दि. २०.०१.२०२२ रोजी लेखी निवेदनाव्दारे मागणी केलेली होती.
(२) खोडाळा ता. मोखाडा जि. पालघर येथील ३३/२२ के. व्ही. नवीन उपकेंद्राचे काम पूर्ण झालेले असून दि. २७.१०.२०२१ रोजी सदर उपकेंद्राची चाचणी घेण्यात आली होती. सदर उपकेंद्राच्या कामात असलेल्या २५ त्रुटी दुरुस्त करण्यात आलेल्या आहेत. दि.१९.०२.२०२२ रोजी सदर उपकेंद्र कार्यान्वित करण्यात आलेले आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

खर्डा (ता.बाभुळगाव, जि.यवतमाळ) येथील खर्डा लघुपाट बंधारे प्रकल्पास सुधारीत प्रशासकीय मान्यता व प्रकल्पाचे काम पुर्ण करण्याबाबत

(३५) ४०८१८ (०५-०४-२०२२). डॉ.अशोक उईके (राळेगाव) : सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) खर्डा (ता.बाभुळगाव, जि.यवतमाळ) परिसरात खर्डा गावाजवळील नाल्यावर प्रकल्पाचे बांधकाम सन २००९ पासून सुरु करण्यात येवून सदर कामास रुपये २९.१६ कोटींची प्रशासकीय मान्यता देण्यात आली होती, सद्य:स्थितीत प्रकल्पाच्या कामाकरीता रुपये ३५.९३ कोटी खर्च झाला असून प्रकल्पाची घळभरणी वगळता मातीकाम पूर्ण झाले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्रकल्पाचे बांधकाम पूर्ण करण्यात आल्यास सदर प्रकल्पामुळे खर्डा, गवंडी, किन्ही, फतीयाबाद, गोंधळी, विरखेड, वाटखेड या गावातील ११७५ हेक्टर शेती सिंचनाला लाभ मिळणार असल्याचे दिनांक २२ जानेवारी, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर लघु प्रकल्प बांधकामामुळे मौ.सरुळ गावाचे पुनर्वसन करणे, गावाजवळील ३३ के.व्ही विदयूत उपकेंद्र स्थलातंरण करणे, उच्चदाब वाहिनी स्थलातंरण करणे, वन जमिनी प्रस्तावास मान्यता मिळणे इ. बाबीचा अंतर्भाव केल्यामुळे प्रकल्पाच्या सुधारित किमतींत वाढ झाली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, प्रकल्पाच्या बुडीत क्षेत्रातील जमीन खरेदी विक्रीवर निर्बंध असल्यामुळे बुडीत क्षेत्रातील शेतकऱ्यांना खरेदी विक्रीचे व्यवहार करण्यास अडचण निर्माण होत असून प्रकल्पाची सुधारित प्रशासकीय मान्यता रा.तां.स.स.नाशिक येथे पाठविण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन प्रकल्प पूर्ण करण्यासाठी सुधारित प्रशासकीय मान्यता देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (१०-११-२०२२) : (१) होय, हे खरे आहे.
(२) होय, खर्डा प्रकल्पाचे धरण व वितरण व्यवस्थेचे काम पूर्ण झाल्यास उक्त गावांना सिंचनाचा लाभ मिळणार असून मूळ प्रकल्प अहवालानुसार ११७५ हे. क्षेत्र ओलीताखाली येणार आहे.
(३) होय, खर्डा प्रकल्पाचे काम सुरु असताना क्षेत्रीय परिस्थितीनुसार सुधारीत सर्वेक्षण करण्यात आले. त्यानुसार मौ.सरुळ गावाजवळील ३३ के.व्ही. विदयुत उपकेंद्र, उच्चदाब वाहिनी, वन जमीन बाधित होत आहे. मौ. सरुळ गावाचे पुनर्वसन करणे, गावाजवळील ३३ के.व्ही. विदयुत विदयुत उपकेंद्र स्थलांतरण करणे, उच्चदाब वाहिनी स्थलांतरण करणे, वन जमीन प्रस्तावास मान्यता मिळणे इ. बाबींचा अंतर्भाव केल्यामुळे तसेच अदययावत दरसूचीमुळे प्रकल्पाच्या सुधारीत किंमतीत वाढ होत आहे.
(४) होय, हे खरे आहे.
तसेच खर्डा प्रकल्पाचा प्रथम सुधारीत प्रशासकीय मान्यता प्रस्ताव राज्य तांत्रिक सल्लागार समिती,नाशिक येथे सादर असून छाननी अंतर्गत आहे.
(५) खर्डा प्रकल्प पूर्ण करण्यासाठी सुधारीत प्रशासकीय मान्यता प्रस्ताव रु.४४२.५० कोटी करिता तयार करण्यात आला असून राज्य तांत्रिक सल्लागार समिती, नाशिक येथे छाननी अंतर्गत आहे. प्रकल्पाचा सुधारीत प्रशासकीय मान्यता प्रस्ताव शासनास प्राप्त झाल्यानंतर पुढील कार्यवाही करण्यात येईल.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

मुंबई शहर आणि उपनगरात अनेक झोपडपट्टया पुनर्विकासाच्या प्रतिक्षेत असल्याबाबत

(३६) ४०९४६ (१०-०४-२०२२). श्री.संजय केळकर (ठाणे) : सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई शहर आणि उपनगरात कित्येक झोपडपट्टीधारक अनेक वर्षापासून पुनर्विकासाच्या प्रतिक्षेत असल्याची बाब माहे जानेवारी २०२२ वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे हे खरे काय,
(२) असल्यास, मुंबई महापालिका व एसआरए एकत्रित काम करुन प्रलंबित झोपडपट्यांच्या पुनर्विकासाचे प्रकल्प तात्काळ मार्गी लावण्यासाठी उपाययोजना न करण्याची कारणे काय आहेत,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली काय वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. देवेंद्र फडणवीस (१६-११-२०२२) : (१) होय, हे खरे आहे.
(२) व (३) रखडलेल्या झोपडपट्टी पुनर्वसन योजना गतीमान करण्याकरिता शासनाने धोरणात्मक निर्णय घेतला आहे.
सदर धोरणानुसार 'सर्वाकरिता परवडणारी घरे' देणाऱ्या विकासकाची निविदा प्रक्रियेने नियुक्ती करण्याची तरतूद

तसेच ‘अभय योजना’ राबवून वर्षानुवर्षे रखडलेल्या झोपडपट्टी पुनर्वसन योजना मार्गी लावण्याचे धोरण ठरविले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

मुंबईमध्ये झोपडपट्टी पुनर्वसन योजनेच्या सदनिका नियमबाह्य पद्धतीने विकून पुन्हा नव्याने झोपड्या बांधण्यात आल्याबाबत

(३७) ४१०५२ (२८-०३-२०२२). श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) : सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईमध्ये झोपडपट्टी पुनर्वसन योजनेच्या माध्यमातून झोपडपट्ट्यांच्या जागी अनेक इमारती उभ्या राहिल्या आहेत हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर झोपडीधारकांना यात मोफत सदनिका मिळत आहेत हे खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर सदनिका नियमबाह्य पद्धतीने विकून पुन्हा नव्याने झोपड्या उभ्या केल्या जात आहेत हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सरकारी किंवा वन जमिनीवर अतिक्रमण करीत असलेल्या भूमाफियांवर शासनाच्या वतीने कोणती कारवाई करण्यात आली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. देवेंद्र फडणवीस (१६-११-२०२२) : (१) होय, हे खरे आहे.
(२) हे अंशत: खरे आहे.

गृहनिर्माण विभागाकडील शासन निर्णय क्रं.झोपुधो- १००१/प्र.क्र.१२५/१४/झोपसु-१, दिनांक १६.०५.२०१५ अन्वये दि.०१.०१.२००० किंवा त्यापूर्वीपासून अस्तित्वात असलेल्या परिशिष्ट-II मध्ये पात्र झालेल्या झोपडीधारकांना झोपडपट्टी पुनर्वसन योजनेंतर्गत मोफत सदनिका वाटप केल्या जातात.

तसेच गृहनिर्माण विभागाकडील शासन निर्णय दिनांक १६.०५.२०१८ अन्वये दिनांक ०१.०१.२००० पासून दिनांक ०१.०१.२०११ पर्यंतच्या परिशिष्ट-II मध्ये सशुल्क पुनर्वसनास पात्र ठरलेल्या झोपडीधारकांना शासन धोरणाप्रमाणे सशुल्क रकमेचा भरणा केल्यानंतर सदनिका वाटप करण्याची तजविज ठेवण्यात आली आहे.
(३) सदनिका नियमबाह्य पध्दतीने विकतात ही बाब खरी आहे. परंतु अशा तक्रारी प्राप्त झाल्यास त्यानुषंगाने तपासणी करुन झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाकडून वेळोवेळी निष्कासनाची कारवाई करण्यात येते. तसेच झोपडपट्टी पुनर्वसन योजनेमध्ये निष्कासित केलेल्या जागेवर पुन:श्च झोपड्या उभ्या केल्यास कलम ३Z अंतर्गत सक्षम प्राधिकारी यांच्याकडून कारवाई केली जाते.
(४) सरकारी किंवा वन जमिनींवर अतिक्रमण करणाऱ्या व्यक्तीवर महाराष्ट्र जमिन महसूल अधिनियम, १९६६ च्या कलम ५० मधील तरतुदींनुसार महसूल विभागाकडून कारवाई केली जाते.

राज्यातील ३ हजार ६५ बांधकाम प्रकल्पांतील सदनिका, व्यापारी गाळे यांची विक्री रोखण्याचा निर्णय महाराष्ट्र रिअर इस्टेट रेग्युलेटरी ॲथॉरिटीने (महारेरा) घेतल्याबाबत

(३८) ४१११२ (१०-०४-२०२२). श्री.राजेंद्र पाटणी (कारंजा), श्री.सुरेश (राजूमामा) भोळे (जळगाव शहर), श्रीमती माधुरी मिसाळ (पर्वती) : सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) गेल्या ४ वर्षांत राज्यातील ३ हजार ६५ बांधकाम प्रकल्पांतील सदनिका, व्यापारी गाळे यांची विक्री रोखण्याचा निर्णय महाराष्ट्र रिअर इस्टेट रेग्युलेटरी ॲथॉरिटी (महारेरा) ने घेतला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, ज्या प्रकल्पांची नावे या निर्बंध घातलेल्या प्रकल्पांच्या यादीत आहेत त्यांना आपल्या प्रकल्पातील सदनिका, व्यापारी गाळे यांच्या विक्रीकरीता जाहिरात करणे, ग्राहकांना विक्री करणे वगैरे प्रक्रिया करण्यास प्रतिबंध केला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, ४ वर्षांत सदरहू बांधकामांमध्ये पैसे गुंतवलेल्या व घर खरेदी केलेल्या नागरिकांना दिलासा देण्याबाबत शासनाने काय कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय?

श्री. देवेंद्र फडणवीस (१७-११-२०२२) : (१) व (२) होय, हे खरे नाही.

स्थावर संपदा (विनियमन व विकास) अधिनियम, २०१६ मधील तरतुदीनुसार ज्या प्रकल्पाची मुदत पूर्ण करण्याचा कालावधी संपूष्टात आलेला आहे, अशा प्रकल्पांची यादी महाराष्ट्र स्थावर संपदा नियामक प्राधिकरणाच्या संकेत स्थळावर प्रसिध्द करण्यात येते.

(३) महाराष्ट्र स्थावर संपदा नियामक प्राधिकरणाकडे अर्धन्यायिक स्वरुपाचे काम पार पाडले जाते. सदर प्रकल्प पुर्ण करण्याच्या अनुषगांने स्थावर संपदा (विनियमन व विकास) अधिनियम, २०१६ मधील तरतुदीनुसार ज्या प्रकल्पातील ग्राहक संयुक्तपणे कलम ७ अन्वये तक्रार दाखल करतात अशा प्रकल्पातील ग्राहकांची, विकासकाची संयुक्तपणे सुनावणी घेऊन पुढील कार्यवाही करण्यात येते.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

यवतमाळ जिल्हा परिषदेच्या प्रशासकीय कार्यालयातील शासकीय कर्मचाऱ्यावर नियमबाह्यरित्या पोलीसांनी केलेल्या कारवाईबाबत

(३९) ४११२१ (१३-०४-२०२२). श्री.मदन येरावार (यवतमाळ), श्री.नामदेव ससाणे (उमरखेड) : सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) यवतमाळ जिल्हा परिषदेच्या प्रशासकीय इमारतीच्या डी.आर.डी. ऑफीस जवळील खुल्या प्रांगणात जेवणासाठी बसलेल्या शासकीय कर्मचाऱ्यावर नियमबाह्यरित्या जुगार खेळत असल्याचे समजून स्थानिक पोलीस विभागामार्फत माहे फेब्रुवारी, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान कारवाई करण्यात आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर परिसरातील केलेल्या कारवाईबाबत स्थानिक पोलीस विभागाने जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी वा उपमुख्य कार्यकारी अधिकारी यांची परवानगी घेतली वा घेण्यात आली होती काय,

(३) असल्यास, याप्रकरणी पोलीस विभागाव्दारे करण्यात आलेल्या कारवाईमुळे मिनी मंत्रालय समजल्या जाणा-या जिल्हा परिषदेची नाहक बदनामी झाली, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, यासंदर्भात पोलीस विभागाव्दारे नियमबाह्यरित्या करण्यात आलेल्या कारवाईबाबत संबंधीत पोलीस अधिकाऱ्यावर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (१७-११-२०२२) : (१) होय. कारवाई करण्यात आली आहे.

(२) यवतमाळ जिल्हा परिषदेच्या मागील सार्वजनिक खुल्या प्रांगणात सार्वजनिक ठिकाणी काही इसम जुगार खेळत असल्याची गोपनीय माहिती मिळाल्याने कायदेशीर कारवाई करण्यात आली आहे. छापा मारल्यानंतर जुगार खेळणारे इसम हे शासकीय कर्मचारी असल्याचे निष्पन्न झाले आहे.

(३) व (४)

पोलीस विभागाव्दारे करण्यात आलेली कार्यवाही कायदेशीर असल्याने जिल्हा परिषदेची बदनामी झाली नसून संबंधित पोलीस अधिका-यावर कार्यवाही करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

घरगुती वीजग्राहकांना सौर ऊर्जा यंत्रणेसाठी अनुदान मिळणेबाबत.

(४०) ४१२१० (१९-०४-२०२२). श्री.मोहनराव हंबर्डे (नांदेड दक्षिण), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), श्री.जितेश अंतापूरकर (देगलूर), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्रीमती मेघना साकोरे बोर्डीकर (जिंतूर), श्री.नारायण कुचे (बदनापूर) : सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात महावितरणाच्या घरगुती वर्गवारीतील ग्राहकांसाठी छतावरील (रुफटॉप) सौर ऊर्जा निर्मिती यंत्रणा बसविण्यासाठी केंद्र शासनाकडून ४० टक्क्यापर्यंत अनुदान मिळणार असल्याचे माहे सप्टेंबर,२०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या उपक्रमामुळे मासिक घरगुती वीज देयकात मोठी बचत होणार असल्याने हा कार्यक्रम राज्यात राबविण्यात आला आहे काय,
(३) असल्यास, सदरील उपक्रम राज्यात राबविण्यात आला असल्यास आजपावेतो किती वीजधारकांनी सदरहु योजनेचा लाभ घेता असून मासिक घरगुती वीज देयकात किती बचत झाली आहे,
(४) असल्यास, राज्यात अधिकाधिक वीजग्राहकांनी सौरउर्जेला प्राधान्य द्यावे यासाठी जनजागृती करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (११-१०-२०२२) : (१) केंद्र शासनाच्या नवीन व नवीकरणीय ऊर्जा मंत्रालयाने सन २०१९ मधे रूफटॉप सौर योजना टप्पा-२ जाहीर करून माहे मार्च, २०१९ मध्ये वीज वितरण कंपन्याची नोडल एजन्सी म्हणून नियुक्ती केली. या योजनेअंतर्गत घरगुती ग्राहकांसाठी १ किलोवॅट ते ३ किलावॅट पर्यंत ४० टक्के व ३ किलोवॅट ते १० किलोवॅट पर्यंत २० टक्के प्रकल्प खर्चाच्या प्रमाणात आणि गट गृहनिर्माण संस्था व निवासी कल्याणकारी संघटना यांचेसाठी १ किलोवॅट ते कमाल ५०० किलोवॅट (प्रत्येकी घरासाठी १० किलोवॅट मर्यादित)पर्यंत २० टक्के प्रकल्प खर्चाच्या प्रमाणात केंद्र शासनाकडून अनुदान मिळणार आहे.
(२) होय. सदर योजना महावितरण कंपनीव्दारे राज्यात राबविण्यात येत आहे.
(३) या योजनेअंतर्गत दिनांक १/१/२०२२ पर्यंत ६४२ ग्राहकांचे २४९३ किलोवॅट क्षमतेची रूफटॉप सौर यंत्रणा कार्यान्वित झालेली असून दरमहा प्रति ग्राहक प्रति किलोवॅट मागे अंदाजे १२० विजेच्या युनिट्ची बचत होणार आहे.
(४) महावितरण कंपनीव्दारे घरगुती ग्राहकांना लघु संदेश (SMS) पाठविणे, वृत्तपत्रामधून योजनेची जाहीरात प्रसिध्द करणे, ग्राहकांना अर्ज करण्यासाठी Online Web Portal तयार करणे त्याचप्रमाणे महावितरण कंपनीच्या घरगुती वीज ग्राहकांच्या वीज देयकावर सदर योजनेची जाहीरात प्रसिध्द करण्याबाबत व योजनेची माहिती पत्रक महावितरण कंपनीच्या सर्व क्षेत्रीय कार्यालयामध्ये लावण्याबाबतचा कृती आराखडा निश्चित करण्यात आला आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

हिवरा (जि.बुलढाणा) तालुक्यातील महावितरण च्या अधिकारी ग्राहकांच्या तक्रारींकडे दुर्लक्ष करीत असल्याबाबत

(४१) ४१४३० (२८-०३-२०२२). श्री.संजय रायमुलकर (मेहकर) : सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) हिवरा (जि.बुलढाणा) तालुक्यातील महावितरण कंपनीचे अधिकारी व कर्मचारी आपले मोबाईल बंद करुन ठेवतात, सुरु असले तर उचलत नाही, अशा अनेक वीज ग्राहकांच्या तक्रारीच्या संदर्भात स्थानिक लोकप्रतिनिधीनी वीज कंपनी अधिका-यांची बैठक घेऊन यासंदर्भात समस्या सोडविण्याचे आदेश संबधित अधिका-यांना दिनांक ९ जानेवारी, २०२२ रोजी वा त्यासुमारास दिले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, त्यानुसार आतापर्यंत कोणकोणत्या समस्यांचे निराकरण करण्यात आले आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (१०-११-२०२२) : (१) हे अंशतः खरे आहे.
तत्कालीन मा. मंत्री (ऊर्जा), महाराष्ट्र राज्य यांनी मंत्रालय येथे झालेल्या दि. ०९ फेब्रुवारी २०२२ रोजी बैठकीत मेहकर मतदार संघातील समस्या सोडविण्याचे आदेश महावितरणच्या अधिकाऱ्यांना दिले.
(२) हिवरा (जि. बुलढाणा) येथील महावितरण कंपनीचे अधिकारी व कर्मचारी यांना लोकप्रतिनिधींसह सामान्य ग्राहकांचे फोन नियमीत उचलण्याबाबत निर्देश देण्यात आलेले आहेत. त्याचबरोबर स्थानिक पातळीवरील विद्युत समस्यांचे निराकरण तातडीने करण्याबाबत निर्देशीत करण्यात आले आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

मेहकर (जि.बुलढाणा)येथील उपविभागीय महावितरण कार्यालयाकडे विदयुत रोहित्र उपलब्ध नसल्याबाबत

(४२) ४१४३१ (२८-०३-२०२२). श्री.संजय रायमुलकर (मेहकर) : सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मेहकर (जि.बुलढाणा) येथील उपविभागीय महावितरण कार्यालयाकडे सद्य:स्थितीत एकही विदयुत रोहित्र नसल्याची बाब माहे जानेवारी, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली , हे खरे आहे काय,

(२) असल्यास, चनखोरे कॉलनीतील विदयुत रोहित्र गेल्या तीन दिवसांपासून जळालेले असून ते ही बदलण्यात आले नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त उपविभागीय महावितरण कार्यालयाकडे एकही विदयुत रोहित्र उपलब्ध नसल्याची कारणे काय आहेत,

(४) असल्यास, उक्त प्रकरणाची शासनाने चौकशी करुन रोहित्र उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (१५-११-२०२२) : (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

दि. २१.१२.२०२१ रोजी नादुरुस्त झालेले रोहित्र त्याच दिवशी त्वरीत बदलविण्यात आले मात्र सदर रोहित्र काही तांत्रिक कारणामुळे पुन्हा नादुरुस्त झाल्याने ते दि. २३.१२.२०२१ रोजी बदलण्यात आले.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

पेनटाकळी (जि.बुलढाणा) प्रकल्पाचा सुधारित प्रशासकीय मान्यता प्रस्ताव विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळाच्या माध्यमातून शासनास सादर करण्याबाबत

(४३) ४१४३८ (१२-०४-२०२२). श्री.संजय रायमुलकर (मेहकर) : सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पेनटाकळी (जि.बुलढाणा) प्रकल्पाची सुधारित प्रशासकीय मान्यता ही ४१६ कोटी ४९ रुपयांची असल्याने त्यात ती बाब अंतर्भूत नसल्यामुळे यासाठी विशेष प्रस्ताव विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळाच्या माध्यमातून शासनास सादर करण्यात आला आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकल्पाकरिता अर्थसंकल्पामध्ये निधीची तरतूद करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशी अंती काय आढळून आले तद्अनुषंगाने उक्त प्रकल्पाकरिता निधी उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाकडून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (१६-११-२०२२) : (१) पेनटाकळी प्रकल्पाच्या रू. ४१६.५९ कोटी किंमतीच्या चतुर्थ सुधारीत प्रशासकीय मान्यता प्रस्तावास महामंडळाचा निर्णय क्र. ६७ /विपाविम/कांता ३(२)/पेनटाकळी/चतुर्थसुप्रमा / (धा.क्र.२१),दि.३०.०४.२१ नुसार मान्यता प्राप्त झाली आहे.

(२) पेनटाकळी प्रकल्पास सन २०२२-२३ या आर्थीक खर्चास रु. ११ कोटीची तरतुद आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

मेहकर उपविभागात (जि.बुलढाणा) अवैध व्यवसाय मोठ्या प्रमाणात सुरु असल्याबाबत

(४४) ४१४४१ (१२-०४-२०२२). श्री.संजय रायमुलकर (मेहकर) : सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मेहकर उपविभागातील (जि.बुलढाणा) मेहकर डोणगांव आणि लोणार पोलिस स्टेशनच्या ठाणेदारांची जिल्हा पोलिस अधिक्षक यांनी बदली करुनही या विभागातील अवैध व्यवसाय मोठ्या प्रमाणात सुरु असल्याचे माहे जानेवारी, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी या भागातील अवैध व्यवसायाला आळा घालण्याकरिता शासनाने कोणत्या उपाययोजना केल्या तसेच याबाबत शासनाची भूमिका काय आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (१७-११-२०२२) : (१) हे खरे नाही.

(२) बुलढाणा जिल्हयात कोठेही अवैध धंदे चालणार नाही याबाबत सर्व ठाणेदार यांना पोलीस अधीक्षक, बुलढाणा यांचेकडून वेळोवेळी लेखी सूचना देण्यात येतात. तसेच सर्व ठाणेदार यांचेकडून करण्यात आलेल्या कार्यवाहीचा वेळोवेळी आढावा घेण्यात येतो.

सर्व ठाणेदार यांचेकडून पोलीस स्टेशन स्तरावर वेळोवेळी विशेष मोहिम राबविण्यात येतात. कोठेही चोरुन लपून अवैध धंदे चालणार नाही यादृष्टीने गोपनीय माहिती काढण्यात येते. अवैध धंदे करताना मिळून आल्यास अशा अवैध धंदयाचे समुळ उच्चाटन करण्याचे दृष्टीने त्यांचे विरुध्द वेळीच छापे टाकून आरोपातांविरुध्द योग्य ती प्रतिबंधात्मक कार्यवाही करण्यात येते.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

मेहकर (जि.बुलढाणा) येथे बनावट मृत्यूपत्राच्या आधारे खोट्या सह्या करुन जमिन बळकाविल्याबाबत

(४५) ४१४४३ (१२-०४-२०२२). श्री.संजय रायमुलकर (मेहकर) : सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मेहकर (जि.बुलढाणा) येथे बनावट मृत्यूपत्राच्या आधारे खोट्या सह्या करुन जमिन बळकविण्याचा प्रकार निदर्शनास आला असून मयताच्या पत्नीने पोलिस ठाण्यात दिनांक २३ जानेवारी, २०२१ रोजी वा त्यासुमारास तक्रार नोंदविली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू प्रकरणात दुय्यम निबंधकांचाही समावेश आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने उक्त प्रकरणाची चौकशी केली आहे काय, चौकशीनुसार त्यात काय आढळून आले, तसेच आतापर्यंत किती जणांवर कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (१५-११-२०२२) : (१) होय.

(२) व (३) सदर प्रकरणी गु.र.नं. ६१०/२०२१ भा.दं.वि. कलम ४२०, ४६५, ४६७, ४७१, ३४ अन्वये गुन्हा दाखल आहे. सदर गुन्हयात दुय्यम निबंधक, मेहकर जि. बुलढाणा यांचेसह इतर ५ आरोपीं अटक पूर्व जामीनवर असून गुन्ह्याचा तपास सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

अकोट (जि. अकोला) शहरातील पोलीस कर्मचाऱ्यांच्या वसाहतीची दुदर्शा झाल्याबाबत

(४६) ४१४७८ (०७-०४-२०२२). श्री.प्रकाश भारसाकळे (अकोट) : सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अकोला जिल्ह्यातील अतिसंवेदनशील तालुका म्हणून गणला जाणाऱ्या अकोट शहरातील पोलीस कर्मचाऱ्यांच्या वसाहतीची अत्यंत दुदर्शा झालेली असून वसाहतीच्या पुर्ननिर्मितीचा प्रस्ताव शासन दरबारी प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी उपविभागीय पोलीस अधिकारी यांच्या कार्यालयाची देखील पडझड झाल्याने पोलीस कर्मचाऱ्यांना अडचणींना सामोरे जावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यासंदर्भात पोलीस वसाहतीच्या निर्मिती व समस्यांबाबत शासनाने कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (१७-११-२०२२) : (१) व (२) होय

अकोला जिल्हयातील अकोट शहर व अकोट ग्रामीण, तसेच तेल्हारा, हिवरखेड व दहिहांडा येथील पोलीस वसाहतीमधील निवासस्थाने अत्यंत जीर्ण झालेली असल्याने त्या ठिकाणी नवीन सेवा निवासस्थाने बांधकाम करणेबाबतचा प्रस्ताव पोलीस महासंचालक, म.रा., यांना प्राप्त झाला आहे.

(३) पोलीस महासंचालक यांनी राज्यातील निवासी व अनिवासी इमारतीच्या बांधकामापैकी १८४ पोलीस ठाणे व ५३ इतर प्रशासकीय इमारत व ५६,९२३ सेवानिवासस्थाने बांधकाम प्रकल्पास प्राधान्यक्रम ठरविण्यात आला आहे. सदर यादीस शासन मान्यता मिळण्याबाबतची कार्यवाही सुरु आहे. शासन मान्यतेनंतर व निधी उपलब्धतेनुसार पुढील कार्यवाही महाराष्ट्र राज्य पोलीस गृहनिर्माण व कल्याण महामंडळ मर्यादित, यांच्या मार्फत हाती घेण्यात येईल.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

अकोट (जि.अकोला) तालुक्यातील कोल विहीर येथील शेतामध्ये शॉर्टसर्कीट झाल्याबाबत

(४७) ४१४८३ (०९-०४-२०२२). श्री.प्रकाश भारसाकळे (अकोट) : सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अकोट (जि.अकोला) तालुक्यातील कोल विहीर येथील शेतकरी श्री.मोहन काकड यांच्या शेतामधून विजेच्या तारा गेल्याने काही ठिकाणी शॉकसर्कीट होऊन ऊस पिक जळून गेल्याने लाखो रुपयांचे नुकसान झाले हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी महावितरणा तर्फे अद्यापही नुकसानीबाबत पंचनामा करण्यात आलेला नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणाची चौकशी करुन नुकसानीचे पंचनामे करुन नुकसानग्रस्तांना नुकसान भरपाई देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (१४-११-२०२२) : (१) हे खरे आहे. दि.१४ नोव्हेंबर २०२१ रोजी शेतकरी मोहन काकड यांच्या शेतामध्ये विदयुत तारांमध्ये झालेल्या घर्षणामुळे स्पार्किंग होवुन आग लागल्याची घटना घडली.

(२) हे खरे नाही. सदर प्रकरणी तालुका कृषी अधिकारी, तलाठी व महावितरणचे अधिकारी यांच्या समवेत दि. २२ नोव्हेंबर, २०२१ रोजी नुकसानीबाबत पंचनामा करण्यात आला.

(३) सदर घटनेची चौकशी विद्युत निरीक्षक कार्यालय, अकोला यांच्या मार्फत करण्यात आली. विद्युत निरीक्षक कार्यालय, अकोला यांच्या अहवालानुसार नुकसान भरपाई प्रस्ताव तयार करण्यात आला असून सदर प्रस्ताव मंजूर प्रक्रियेधीन आहे. सदरील प्रस्तावाची प्राधान्याने मंजूरी देऊन नुकसान भरपाई रक्कम अदा करण्यात येईल.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

पैठण (जि.औरंगाबाद) येथे गुंतवणुकीवर आमिष दाखवून शेतकऱ्यांची फसवणूक केल्याबाबत

(४८) ४१५१६ (१२-०४-२०२२). श्री.योगेश सागर (चारकोप) : सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पैठण (जि.औरंगाबाद) येथे बोकुड जळगाव, बोकुड जळगाव तांडे, पाटोदे वडगाव, चिंचोली, जांभळी, निलसगाव, जांभळी तांडा व इतर गावातील शेकडो शेतकऱ्यांना ३०:३० गुंतवणूक घोटाळयामध्ये जास्त परतावा मिळण्याचे आमिष दाखवून कोट्यवधी रुपयांना फसविल्याचे दिनांक २४ जानेवारी, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी पोलीस चौकशी करीत असून हा घोटाळा ५०० कोटीपेक्षा जास्त असल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यासंदर्भात चौकशीत केली आहे काय, चौकशीनुसार गुंतवणूकदार गरीब शेतकऱ्यांचे पैसे परत मिळण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (११-११-२०२२) : (१) होय हे खरे आहे.

(२) सदर गुन्ह्याच्या तपासात आरोपी संतोष राठोड यांचे बँक खात्यामधून सन २०१६ ते २०२१ दरम्यान बँक खात्यातील व्यवहाराची तपासणी केली असता सदर खात्यामधून साधारणत: रु. ३३७ कोटी रक्कम जमा करुन काढण्यात आल्याचे निदर्शनास आले आहे.

(३) आरोपींनी बेकायदेशीर योजना सुरु करुन जास्त परताव्याचे आमिष दाखवून लोकांकडून घेतलेले पैसे परत न करता त्यांची फसवणूक केल्याचे प्रथमदर्शनी तपासात निष्पन्न झाले आहे.

सदर प्रकरणी ०६ आरोपी निष्पन्न झाले असून आरोपी संतोष राठोड यास अटक करण्यात आली असून इतर आरोपी फरार आहेत.

सदर प्रकरणी पुढील तपास सुरु आहे.

(४) विलंब झालेला नाही.

मौजे आनंदवाडी (ता.औसा, जि.लातूर) येथील विस्तारीत वस्तीत सिंगल फेज रोहित्राचे काम करण्याबाबत

(४९) ४३७९१ (०९-०४-२०२२). श्री.अभिमन्यु पवार (औसा) : सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे आनंदवाडी (ता.औसा, जि.लातूर) येथील विस्तारीत वस्तीत सिंगल फेज रोहित्राचे काम करण्याबाबत तसेच सदरील वस्तीतील घरांना विजजोडणी देण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी कार्यकारी अभियंता महावितरण विभाग निलंगा यांच्याकडे दि. २४ सप्टेंबर, २०२१ रोजी वा त्यासुमारास निवेदनाद्वारे मागणी केली , हे खरे आहे काय,

(२) असल्यास, औसा विधानसभा मतदारसंघात सिंगल फेज विदयुत जोडणी नसलेल्या वस्ती किती आहेत व सदर वस्त्यांमधील घरांना सिंगल फेज जोडणी देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (१५-११-२०२२) :(१) हे खरे आहे.

(२) मौ. आनंदवाडी येथील सिंगलफेज रोहीत्राचे काम जिल्हा नियोजन समिती (DPDC) योजनेअंतर्गत सन २०२१-२२ या आर्थिक वर्षात प्रस्तावित केले असून निधीची उपलब्धता झालेली असून सदरील काम अग्रक्रमाने पूर्ण करण्याचे नियोजित आहे. विस्तारीत वस्त्यांवर सिंगलफेज रोहीत्रांचे आवश्यकतेबाबत मौ. आनंदवाडी वगळता इतर कुठल्याही वस्त्यांकडून मागणी प्राप्त झालेली नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

भुदरगड (जि.कोल्हापूर) येथे तत्कालीन पोलीस निरिक्षक यांनी लॉकडाऊनमध्ये अधिकाराचा गैरवापर केल्याबाबत

(५०) ४३८२६ (११-०४-२०२२). श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी) : सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भुदरगड (जि.कोल्हापूर) येथे पोलीस ठाणे तत्कालीन पोलीस निरिक्षक यांनी लॉकडाऊनच्या कालावधीमध्ये चुकीच्या पद्धतीने वाहनचालकांवर दंडात्मक कारवाई केल्याचे तसेच अधिकाराचा गैरवापर करुन प्रतिष्ठीत नागरीकांना व सर्वसामान्य जनतेला अर्वाच्य भाषेत शिवीगाळ करण्यात आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणाबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी पोलीस निरिक्षक यांच्या कामकाजाची चौकशी करुन त्यांचेवर कारवाई करण्याबाबत विशेष पोलीस महानिरिक्षक, कोल्हापूर परिक्षेत्र व जिल्हा पोलीस अधिक्षक, कोल्हापूर यांचेकडे वेळोवेळी पत्रव्यवहार करुन कोणती कारवाई केली आहे काय,

(३) असल्यास, यासंदर्भात लोकप्रतिनिधी यांनी जिल्हा पोलीस अधिक्षक, कोल्हापूर यांना वेळोवेळी लेखी निवेदने व तक्रारी देण्यात आल्या असून कोणती कार्यवाही केली आहे काय,

(४) असल्यास, उक्त पोलीस निरिक्षक यांनी चुकीच्या पद्धतीने केलेल्या कारवाईबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (१५-११-२०२२) : (१) अशा आशयाच्या तक्रारी प्राप्त झाल्याचे निदर्शनास येते.

(२), (३) व (४)

सदर प्रकरणी तक्रारदार श्री. किरण यशवंत पाटील, रा.मठगांव पैकी बशाचामोळा, ता. भुदरगड, जि. कोल्हापूर यांच्या तक्रारीवरुन अपर पोलीस अधीक्षक, गडहिंग्लज विभाग यांचे स्तरावर करण्यात आलेल्या चौकशीमध्ये तत्कालीन पोलीस निरीक्षक, श्री. संजय पंतगे, भुदरगड पोलीस ठाणे यांची कसुरी दिसून आली आहे. सदर कसूरीसाठी पोलीस निरीक्षक, श्री. संजय पंतगे, भुदरगड पोलीस ठाणे यांना विशेष पोलीस महानिरीक्षक, कोल्हापूर परिक्षेत्र, कोल्हापूर यांच्या दि. २६.०८.२०२१ रोजीच्या आदेशान्वये "सक्त ताकीद" देण्यात आली आहे.

याव्यतिरीक्त तक्रारदार श्री. सचिन मारुती कांबळे, रा. गारगोटी, ता.भुदरगड यांच्या तक्रारीवरुन विशेष पोलीस महानिरीक्षक, कोल्हापूर परिक्षेत्र, कोल्हापूर यांना सदर प्रकरणी सादर केलेल्या त्रुटी पूर्तता अहवाला आधारे दि. २४.०५.२०२२ अन्वये "वार्षिक वेतनवाढ २ वर्षासाठी स्थगित का करण्यात येऊ नये" याबाबत कारणे दाखवा नोटीस कसूरदार पोनि/संजय पतंगे यांना अदा करण्यात आली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

विधान भवन : **राजेन्द्र भागवत**
नागपूर. **प्रधान सचिव,**
महाराष्ट्र विधानसभा.

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, नागपूर.